| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १८७ वा | शनिवार दिनांक ०४ ऑक्टोंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### जुगार विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- वाशी पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान वाशी पोलीसांनी दि.३०.०९.२०२५ रोजी वाशी पो ठाणे हद्दीत २ ठिकाणी छापा टाकला. यावेळ अरुण रा.पारगाव ता.वाशी जि. धाराशिव हे पारगाव येथे कोकणे हॉस्पीटलच्या बाजूला कल्याण मटका जुगाराचे साहित्या एकुण ५१० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले वाशी पो. ठाणेच्या पथकास आढळले. तर अशपाक रा.ईट ता. भुम जि. धाराशिव हे नागेवाडी चौकातील पत्राचे शेडसमोर ईट येथे कल्याण मटका जुगाराचे साहित्या एकुण १,५१० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले वाशी पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम- १२ (अ) अन्वये वाशी पो ठाणे येथे स्वतंत्र गुन्हे नोंदवले आहेत.

मुरुम पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान मुरुम पोलीसांनी दि.३०.०९.२०२५ रोजी .मुरुम पो ठाणे हद्दीत दाळिंब येथे छापा टाकला. यावेळी अ संदिप रा. दाळिंब ता.उमरगा जि. धाराशिव हे १६.०० वा. सु. दाळिंब येथे शेडसमोर कल्याण मटका जुगाराचे साहित्या एकुण ९०० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले येरमाळा पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम- १२ (अ) अन्वये मुरुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### कडी कोंडा तोडून सोन्याची, दागिने व रोख रक्कमेची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नारायण सुधाकर पवार, वय ३५ वर्षे, रा. खंडाळा ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचे राहते घराचे पत्रा अज्ञात व्यक्तीने दि. ३०.०९.२०२५ रोजी उचकटून घरात प्रवेश करुन कराचे रुमचा कडी कोंडा तोडून कपाटातील ४९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम ४०,००० असा एकुण १,५६,५००किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-नारायण पवार यांनी दि.०१.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३१(३),३०५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### तुळजापूरातून मोटारसायकलची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी म्हाळाप्पा भिम सोनकडे, वय २९ वर्षे, रा. होटगी ता. द. सोलापूर जि. सोलापूर जि. सोलापूर यांची मोटरसायकल छत्रपती शिवाजी महाराज चौक तुळजापूर येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- म्हाळाप्पा सोनकडे यांनी दि.०२.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## धाराशिवमध्ये केंद्रीय विद्यालयाचा मार्ग मोकळा, खासदार ओमराजे निंबाळकरांच्या पाठपुराव्याला यश



धाराशिव (प्रतिनिधी)- येथील बहुप्रतिक्षित केंद्रीय विद्यालयाला केंद्र सरकारकडून तत्वतः मंजुरी मिळाली आहे. खासदार ओमराजे निंबाळकर यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला मोठे यश आले असून, त्यांनी ही आनंदाची बातमी आपल्या फेसबुक पोस्टद्वारे दिली आहे. या निर्णयामुळे धाराशिव जिल्ह्यातील विद्यार्थी आणि पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. पाठपुराव्याला यश..! खासदार ओमराजे निंबाळकर यांनी आपल्या फेसबुक पोस्टमध्ये पाठपुराव्याला यश..! असे म्हणत या निर्णयाचे स्वागत केले. धाराशिवमध्ये केंद्रीय विद्यालय व्हावे, यासाठी ते गेल्या अनेक दिवसांपासून प्रयत्नशील होते.

जिल्ह्यातील शासकीय कर्मचारी, अधिकारी आणि नागरिकांच्या मुलामुलींना केंद्रीय शिक्षण मंडळाच्या (CBSE) अभ्यासक्रमाचे दर्जेदार शिक्षण मिळावे, ही अनेक वर्षांपासूनची मागणी होती. या तत्वतः मंजुरीमुळे ती मागणी पूर्ण होण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल पडले आहे.

आता नजर राज्य सरकारच्या भूमिकेकडे केंद्रीय विद्यालयाला तत्वतः मंजुरी मिळाली असली तरी, अंतिम मंजुरीसाठी आता राज्य सरकारची भूमिका निर्णायक ठरणार आहे.

खासदार निंबाळकर यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, राज्य सरकारने अंतिम मंजुरीसाठी परिपूर्ण प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवावा. यासाठी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही आपल्या पोस्टमध्ये टॅग करत या प्रक्रियेला गती देण्याची विनंती केली आहे.

राज्य सरकारकडून आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव केंद्र सरकारला सादर झाल्यानंतरच अंतिम मंजुरीची प्रक्रिया पूर्ण होईल. त्यामुळे आता धाराशिववासियांचे लक्ष राज्य सरकारच्या पुढील कार्यवाहीकडे लागले आहे.

## जिल्ह्यात अनुकंपा व MPSC निवड उमेदवारांना नियुक्ती आदेश वितरण होणार ४ ऑक्टोबरला

धाराशिव (जिमाका) -जिल्ह्यातील अनेक कुटुंबांना दिलासा देणारा आणि तरुणांच्या आशा-स्वप्नांना बळ देणारा नियुक्ती आदेश प्रदान कार्यक्रम ४ ऑक्टोबर रोजी जिल्हा नियोजन समिती सभागृह,धाराधिव येथे सकाळी ११ वाजता होणार आहे.

शासनाच्या सर्वसमावेशक सुधारित धोरणानुसार अनुकंपा नियुक्तीसह महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) निवड झालेल्या उमेदवारांना पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते नियुक्ती आदेशांचे वितरण करण्यात येणार आहे.

दि. १७ जुलै २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमाअंतर्गत विविध शासकीय कार्यालये व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील गट-क व गट-ड पदांवर अनुकंपा नियुक्तीची प्रक्रिया राबविण्यात आली होती.त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून गट-क पदाकरिता १९ अनुकंपाधारकांची आणि गट-ड पदाकरिता ३९ अनुकंपाधारकांची शिफारस विविध विभागांना करण्यात आली आहे.जिल्हा परिषद,धाराशिव येथून गट-क पदाकरिता १ व गट-ड पदाकरिता ३८ अनुकंपाधारकांना तर पोलीस विभागामार्फत गट-ड पदाकरिता २ उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येणार आहे.तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) लिपिक-टंकलेखक (गट-क) या पदाकरिता निवड झालेल्या ४० उमेदवारांना देखील नियुक्ती आदेश वितरीत करण्यात येणार आहे.

शासन निर्णयानुसार जिल्ह्यात अनुकंपा नियुक्ती तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शिफारस झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येणार आहेत.या कार्यक्रमात एकूण १४७ उमेदवारांना नियुक्ती आदेश प्रदान करण्यात येणार आहेत. या उपक्रमामुळे अनेक कुटुंबांच्या घरात आनंदाचे सोहळे उजळणार असून, तरुणांच्या कारकिर्दीला नवा वेग मिळणार आहे.रोजगाराची ही नवी संधी म्हणजे शासनाचा लोकाभिमुख निर्णय आणि रोजगाराचा उत्सव ठरणार आहे. या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी श्री.किर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर यांची यांची उपस्थिती राहणार आहे.

## दिव्यांग बांधवांना योजनांचा लाभ त्वरित मिळवून देणे ही प्रशासनाची जबाबदारी-जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार



धाराशिव (जिमाका) – जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणांनी समन्वय साधून समाजातील शेवटच्या स्तरातील दिव्यांगांना शासकीय योजनांचा लाभ त्वरित मिळवून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे.दिव्यांग बांधवांचे जीवन सुकर करण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध असून,लाभार्थ्यांना तत्परतेने सुविधा मिळतील याची काळजी घेतली जाईल.असे प्रतिपादन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी केले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,उस्मानाबाद, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय, जिल्हा शासकीय रुग्णालय व जिल्हा महिला व बालविकास,धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने आज ३ ऑक्टोबर रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,धाराशिव येथे दिव्यांगांना शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी आयोजित शिबिर व कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून श्री.पुजार बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव न्या.भाग्यश्री पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकुरकर,अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.टी.डी.लाकाळ, समाजकल्याणचे सहाय्यक आयुक्त सचिव कवले,जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी सच्चिदानंद बांगर,उपमुख्य कार्यकारी अधिकारी बी.एम. गिरी,प्रभारी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी किशोर गोरे व जिल्हा प्रहार दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष मयुर काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमस्थळी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, जिल्हा शासकीय रुग्णालय,जिल्हा विधी सेवा प्राधिकरणसह अन्य विभागांनी स्टॉल लावून दिव्यांगांना योजनांची माहिती दिली.या शिबिरात ७० दिव्यांगांना यू.डी.आय.डी.कार्ड,बीज भांडवल योजनेअंतर्गत ७ दिव्यांग लाभार्थ्यांना धनादेश,तसेच दिव्यांग अव्यय विवाह अनुदान योजनेअंतर्गत पाच जोडप्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. याशिवाय पाच दिव्यांगांचे आधारकार्ड काढण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाग्यश्री पाटील यांनी केले.सूत्रसंचालन मुख्याध्यापक बालाजी नादरघे यांनी केले तर आभार सच्चिदानंद बांगर यांनी मानले.

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी दिव्यांग सक्षमीकरण विभाग,विशेष शाळा, कर्मशाळा,बालगृहे,जिल्हा सामान्य रुग्णालय,महिला व बालविकास कार्यालय तसेच शिक्षक व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पूरबाधित मदतीपासून वंचित राहणार नाही याबाबतची दक्षता घेणार -जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांची माहिती

धाराशिव (जिमाका) -जिल्ह्यात २१ सप्टेंबरच्या रात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील काही भागात पूर परिस्थिती निर्माण होऊन मोठ्या प्रमाणात शेतीचे व सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले. जीवित व वित्तहानी देखील झाली असून ८ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे.अनेक पाळीव जनावरांचे देखील प्राण गेले आहे. पूरबाधित गावातील कोणताही शेतकरी व नागरिक हा मदतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेऊन काळजीपूर्वक व पारदर्शक पद्धतीने काम करण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिली.

बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित पत्रकार परिषदेत श्री.पुजार बोलत होते.यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर,अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री अनुप सिंगुलवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री पुजार म्हणाले की,अनेकांनी आपल्या आयुष्यात पहिल्यांदाच अशी पूर परिस्थिती बघितली आहे. हेलिकॉप्टरच्या मदतीने तीन दिवस काही नागरिकांना सुरक्षित ठिकाणी पोहोचविण्यात आले आहे. पुराच्या पाण्याने बाधित झालेल्या ३१४९ कुटुंबांना प्रत्येकी १० हजार रुपयांची मदत त्यांच्या बँक खात्यात जमा करणे सुरू आहे. तुळजापूर येथील टाटा सामाजिक विज्ञान संस्थेकडून झालेल्या नुकसानीची सर्वेक्षण करण्याचे काम करण्यात येत आहे. त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यावर नेमके किती नुकसान झाले आहे,याची माहिती मिळणार आहे. नुकसानीचे पंचनामे युद्धपातळीवर सुरू आहे.५ ऑक्टोबरपर्यंत हे पंचनामे पूर्ण करण्यात येतील.जुलै ते ऑगस्ट २०२५ मध्ये झालेल्या पीक नुकसान भरपाईसाठी १८९ कोटी रुपये रक्कम राज्य शासनाकडून प्राप्त झाली आहे.संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात रक्कम जमा करण्याची कार्यवाही सुरू असल्याची माहिती श्री.पुजार यांनी यावेळी दिली.



अशा प्रकारची परिस्थिती भविष्यात उद्भवल्यास कमीत कमी नुकसान कसे होईल नुकसान होईल,यादृष्टीने उपाययोजना करण्यात येतील असे सांगून श्री.पुजार म्हणाले की,पूरपरिस्थिती कमी झाली असून पुरांचे पाणी ओसरत आहे. ग्रामीण भागातील अनेक पुलांची उंची कमी असल्यामुळे दळणवळण व्यवस्था कोलमडली.या पुलांची उंची वाढविण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात येईल.पूरग्रस्तांच्या मदतीसाठी विविध कंपन्या व बँकांच्या सीएसआर निधीतून मदत करण्यात येईल. त्यांना पूरग्रस्त गावांना दत्तक घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.त्यासाठी सीएसआर कॉन्फरन्स लवकरच घेण्यात येईल.पूर ओसरला असला तरी पूरबधित गावांमध्ये रोगराई पसरू नये यासाठी रोगराई प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहे.सेवाभावी संस्थांनी पुरबधित गावांमध्ये परस्पर जाऊन मदत वाटप न करता तालुका प्रशासनाच्या समन्वयातून मदत वाटप करावी.पाळीव जनावरांसाठी मुरघासचा पुरवठा करण्यात येत आहे.शेतकऱ्यांना त्यांच्या गुरांसाठी मोफत चाऱ्याचा पुरवठा करणार असल्याची माहिती श्री.पुजार यांनी यावेळी दिली.

जिल्ह्यातील ४२ महसूल मंडळात अतिवृष्टी झाली असल्याचे सांगून श्री.पुजार म्हणाले की,नुकसानीचा वस्तुनिष्ठ अहवाल शासनाकडे सादर करण्यात आला आहे. गावपातळीवर यंत्रणा समन्वयातून काम करत आहे.जिल्ह्यातील पूरग्रस्त सर्व गावांशी संपर्क झाला आहे.यंत्रणांचे अधिकारी-कर्मचारी बाधित गावात पोहोचून काम करत आहे.शेतकऱ्यांनी या कठीण परिस्थितीत निराश न होता आत्महत्यासारखे टोकाचे पाऊल उचलू नये.शासन व प्रशासन भक्कमपणे आपल्या पाठीशी उभे असल्याचे त्यांनी सांगितले.

टाटा सामाजिक विज्ञान संस्थेकडून सामाजिक व आर्थिक नुकसानीची माहिती गोळा करण्यात येत असल्याचे सांगून श्री. पुजार म्हणाले की, वेगवेगळ्या सेवाभावी संस्था,बँका व दानशूर व्यक्ती पूरग्रस्त भागासाठी मदत करत आहे. असे ते म्हणाले. डॉ.श्री.घोष म्हणाले की,गावांमध्ये आरोग्य विभागाकडून रोगराई प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहे. पूरग्रस्तांची दैनंदिन आरोग्य पथकांकडून आरोग्य तपासणी करण्यात येत आहे. औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. प्रत्येक गावात २ ऑक्टोबर रोजी आयोजित ग्रामसभेतून स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे.पाण्याचे किती स्त्रोत दूषित झाले आहे,हे तपासून उपाययोजना करण्यात येतील.ज्या पाणीपुरवठा योजना दूषित झाल्या आहे,त्यांचे निर्जंतुकीकरण करण्यात येतील.ज्या शाळांचा शालेय पोषण आहार पाण्यामुळे संपूर्णता भिजला आहे, त्या शाळेला शेजारच्या शाळेतून पोषण आहाराचा पुरवठा करण्यात येईल. जिल्हा परिषदेच्या ज्या सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले आहे, त्याच्या दुरुस्तीसाठी किती निधी लागणार आहे, याची माहिती घेऊन त्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून तरतूद करण्यात येणार असल्याचे डॉ.घोष यांनी यावेळी सांगितले.या पत्रकार परिषदेला विविध यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

# लडाखमध्ये दुर्दैवी घटना

भारताचा केंद्रशासित प्रदेश लडाखमध्ये झालेल्या हिंसाचारात आतापर्यंत ४ ठार झाले असून ८० हून अधिक जण घायाळ झाले आहेत. सध्या तेथे केंद्रीय राखीव पोलीस बल आणि सैन्य तैनात करण्यात आले असून तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे. या हिंसाचारात सरकारी संपत्तीची पुष्कळ हानी झाली. पोलिसांच्या गाड्या पेटवण्यात आल्या, भाजपचे कार्यालय जाळण्यात आले. या सर्वांना कारणीभूत आहे, ते तथाकथित पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांचे आंदोलन! त्यांनी १० सप्टेंबर या दिवशी उपोषणाला प्रारंभ केला. त्यांची मागणी होती की, 'लडाखला राज्याचा दर्जा मिळावा आणि लडाखची भूमी, संस्कृती, सभ्यता यांच्या रक्षणासाठी ६ व्या अनुसूचीची पुनर्रचना करावी', म्हणजे या काही अशा मागण्या नव्हत्या की, त्यावर आताच कार्यवाही करावी अन् त्यासाठी त्यांनी टोकाची भूमिका स्वीकारून स्थानिक तरुणांना चिथावणी द्यावी. त्यांच्या मागण्यांचा विचार करता लडाखसारख्या केवळ ३ लाख लोकसंख्या असलेल्या भूप्रदेशाला राज्याचा दर्जा कसा दिला जाऊ शकणार? केंद्रशासनाने लडाखला स्थानिकांच्या मागणीनुसार केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा वर्ष २०१९ मध्ये देऊन त्याच्या विकासाचा मार्ग मोकळा केला होता. त्यामुळे खरेतर त्यांनी याविषयी समाधानी रहायला हवे होते; मात्र म्हणतात ना, एक मागणी पूर्ण केली की, त्यापुढील मागणीला प्रारंभ होतो. लडाखविषयी तेच झाले. आता त्यांच्या '६ व्या अनुसूचीची पुनर्रचना करून लडाख येथील नागरिकांना, संस्कृतीला संरक्षण प्रदान करावे', या मागणीच्या सूत्राच्या अनुषंगाने तेथे असे काय मोठे संकट कोसळले आहे की, सरकारने त्वरित त्यांची ही मागणी मान्य करावी. या मागणीसाठी दीर्घकालीन चर्चेची द्वारे केव्हाही उघडीच आहेत. यासाठीही एवढ्या टोकाची भूमिका घेण्याची आवश्यकता नाही. त्यांच्या उपोषण आंदोलनात दोन जण अत्यवस्थ होऊन त्यांना रुग्णालयात भरती करण्यात आले आणि त्यानंतर तरुणांच्या जमावाला चिथावणी देण्यात आली. नेपाळ आणि बांगलादेश येथील तरुणांनी केलेल्या आंदोलनासारखे हे आंदोलन असे म्हणण्यात आले. परिणामी कोणताही विषय नसतांना आंतरराष्ट्रीय स्तरावर 'जणू भारतात लडाखमध्ये अन्याय होत आहे', असा गैरसमज पसरला. आधीच अस्थिर असलेला जम्मू-काश्मीरचा प्रदेश, त्यात शांत असणाऱ्या लडाखमध्येही काही उपद्रव निर्माण करून तोही अशांत करण्याचाच प्रयत्न यातून पर्यावरणवादी म्हणवून घेणारे वांगचुक यांनी केला. सरकारने त्यांना अटक करून योग्य कृती केली आहे. त्यांच्या संस्थांची विदेशी निधी घेण्याची अनुमती रहित केली आहे. हासुद्धा सरकारचा चांगला निर्णय आहे. आता सरकारने त्यांच्या संस्थेची कसून चौकशी चालू केली आहे; अद्याप चौकशीचा तपशील उघड झालेला नाही. तरी वांगचुक यांच्याकडून चूक झाली आहे, एवढे मात्र निश्चित आहे. भारतात चमकोगिरी करण्यासाठी पर्यावरणवादी, समाजवादी, पुरोगामी, विज्ञानवादी, अहिंसावादी, गांधीवादी, बुद्धीप्रामाण्यवादी इत्यादी विशेषणे स्वतःला लावून चांगल्या प्रकारे लोक प्रसिद्धी मिळवतात.अभिनेते आमीर खान यांच्या '३ इडियट्स' या चित्रपटाद्वारे एका वैज्ञानिकाच्या पात्रामुळे ते प्रसिद्धीस आले. सामाजिक माध्यमांवर पर्यावरणरक्षणाच्या मोठ्या बाता मारतांना व्हिडिओच्या माध्यमातून ते इतरांना उपदेश करत असतात. वांगचुक यांनी उपोषणाच्या ७ व्या दिवशी भयानक गरळ ओकली. वांगचुक यांनी एका स्थानिक कलाकाराच्या म्हणण्याचा संदर्भ देतांना सांगितले की, 'तो म्हणत होता की, चीनने या ठिकाणी येण्याचा प्रयत्न केला, तर त्याला आम्ही रोखायचो. आता मात्र जर तो आला, तर आम्ही त्याला भारतात शिरण्याचे मार्ग दाखवू', या कलाकाराला वाटते तसे होऊ नये; म्हणून सरकारने आमच्या मागण्या मान्य कराव्यात. मागणी मान्य करण्याची ही कुठली पद्धत? वांगचुक थेट शत्रूदेशाला भारतावर आक्रमण करण्यासाठी आणि त्याने आक्रमण केल्यास त्याला साहाय्य करण्याविषयीची चिथावणी देत आहेत. खरेतर हा उघड देशद्रोह आहे. यासाठी त्यांना तात्काळ कठोर शिक्षा होणे आवश्यक आहे. यातून तेही चीनचेही हस्तक असल्याचे आणि स्वतःच्या स्वार्थासाठी ते कोणत्याही थरापर्यंत जाऊ शकतात, हे लक्षात आणून देत आहेत. हे बळ त्यांना आले कुठून ? हे एकाएकी निर्माण झालेले नक्कीच नाही. यासाठी त्यांच्या आर्थिक स्रोताकडे पहाण्याची आवश्यकता आहे. उपलब्ध माहितीनुसार सोनम वांगचुक यांच्या 'हिमालय इन्स्टिटयूट ऑफ अल्टरनेटीव्ह लडाख' या संस्थेच्या न्यासाची एकूण ७ बँक खाती होती. त्यापैकी त्यांनी केवळ ४ घोषित केली होती आणि ३ लपवून ठेवली होती. या बँक खात्यांमध्ये एकूण २१ कोटी रुपये देश आणि विदेशातून आले. त्याचप्रमाणे वांगचुक यांचे एक आस्थापनही आहे. त्याच्या बँक खात्यात त्यांनी स्वतःच्या न्यासाला मिळालेले साडेसहा कोटी रुपये पाठवले होते. याच्या व्यतिरिक्त त्यांची एकूण ९ वैयक्तिक बँक खाती असतांना त्यांनी केवळ एकच उघड केले होते. त्यांच्या वैयक्तिक खात्यावरही देश-विदेशातून कोट्यवधी रुपये वर्ष २०१३ पासून येत होते. विदेशातून हे पैसे वांगचुक यांना कशासाठी पाठवण्यात आले होते? याची चौकशी करण्याची आवश्यकता आहे. वांगचुक यांच्या संस्थेवर सरकारी भूमीचा गैरवापर केल्याचा आरोप असल्याने ती भूमीही त्यांच्याकडून काढून घेण्यात आली होती, म्हणजे अशा प्रकारे बँक खात्यांची लपवाछपवी, मोठ्या प्रमाणात विदेशातून पैसे मिळवणे, सरकारी भूमीचा अपवापर ही कसली लक्षणे आहेत ? आजवर उघड झालेले खोटे सामाजिक कार्यकर्ते, श्रद्धा निर्मूलनाच्या नावाखाली कार्य करणार्या संस्था यांची एक विशिष्ट कार्यप्रणालीच आहे. विदेशातून कोट्यवधी रुपयांच्या देणग्या मिळवायच्या, त्याची माहिती सरकारला द्यायची नाही आणि पैशांचा लेखाजोखाही सादर करायचा नाही. या पैशांतून भारतविरोधी, हिंदुविरोधी कारवाया करायच्या आणि देश अस्थिर करायचा, ही एक 'मोडस ऑपरेंडी' किंवा 'टूलकीट'च आहे. हिंसाचार झाल्यावर तो न रोखता पळ काढणारे वांगचुक यांच्या या देशविरोधी मानसिकतेला कदापि क्षमा करता कामा नये.

# सिद्धी शुगर साखर कारखाना पूर्ण क्षमतेने चालवणार - सहकार मंत्री ना. पाटील

**अहमदपूर/प्रतिनिधी :** सिद्धी शुगर साखर कारखाना या हंगामात पूर्ण क्षमतेने चालवणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी उजना तालुका अहमदपूर येथे केले.

ते उजना तालुका अहमदपूर येथील सिद्धी शुगर अँड अलाईट इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड च्या १४ व्या गळीत हंगामाच्या अग्नि प्रदीपन सोहळ्याप्रसंगी बोलत होते.

व्यासपीठावर माजी राज्यमंत्री बाळासाहेब जाधव, भागवताचार्य कृष्णा महाराज धानोरकर, माजी सरपंच साहेबराव जाधव, व्यवस्थापकीय संचालक अविनाश जाधव, सिद्धी शुगरचे व्हाईस प्रेसिडेंट पी जी होनराव, दीनानाथ राचमाळे, हेमंतराव जाधव, धनराज धुमाळ, शिवानंद हेंगणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिकराव डोके, अहमदपूरचे मुख्याधिकारी संतोष लोमटे, शिरूर ताजबंदचे उपसरपंच सुरज पाटील, जनरल मॅनेजर पी एल मिटकर, अविनाश देशमुख, चंद्रकांत गंगथडे, तुकाराम पाटील, श्रीकांत मजगे, गंगाधर ताडमे, बाळासाहेब बेडदे, मुकुंदराव देशमुख, शेषेराव चावरे, नारायण नाना दुर्गे, बळीराम माकणे, शिवाजी नरवटे, पांडुरंग कांडणगिरे तसेच कारखान्याचे संचालक, चेअरमन, सदस्य, कामगार आणि शेतकरी बांधव यावेळी उपस्थित होते.

या वेळी पुढे बोलताना सहकार मंत्री नामदार पाटील म्हणाले की, शेतकऱ्यांनी




कुठल्याही प्रकारचा संकुचित विचार न करता सर्व संकटांना सामोरे जावे. सरकार म्हणून आम्ही तुमच्या सोबत आहोत, अगदी काही दिवसात पहिल्या टप्प्यातले नुकसान भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यावर मिळणार आहे व दुसऱ्या टप्प्यात व शेतकऱ्यांच्या ज्या जमिनीकडून खरडून गेल्या आहेत त्याचे सुद्धा अनुदान शेतकऱ्यांना प्राप्त होणार आहे. उसाची परिस्थिती चांगली असून , यावर्षी कारखान्याने साडेसहा लाख टनाच क्रशिंग निश्चित केलं असून, यावर्षीचा सुद्धा आपल्या कारखान्याचा गाळप यशस्वीरित्या पूर्ण होईल असा विश्वास राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी बोलताना व्यक्त केला. यावेळी कृष्णा महाराज धानोरकर यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चोपणे दयानंद तर पी जी होनराव यांनी आभार मानले..

# देशातल्या अराजकतेवर गांधी तत्वज्ञानच एकमेव आधार : प्राचार्य नागोराव कुंभार

## महात्मा गांधी जयंती निमित्त राष्ट्र सेवा दल व मजविप तर्फे महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास अभिवादन!

**लातूर/प्रतिनिधी :** सत्य, अहिंसा, करुणा आणि कर्तव्यनिष्ठाचे पुरस्कर्ते युगप्रवर्तक, रक्ताचा एक थेंबही न सांडता ब्रिटिशांच्या गुलामीतून देशाला मुक्त करण्याचे कार्य राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी केले. देशातीलच नव्हे तर जगातील सद्याच्या अराजकतेवर मात करायची असेल तर गांधी विचाराशिवाय पर्याय नाही. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी येथे केले.

महात्मा गांधी यांच्या १५६ व्या जयंती निमित्त आज २ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता राष्ट्र सेवा दल, मराठवाडा जनता विकास परिषद, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, ज्येष्ठ नागरिक



संघाच्यावतीने लातूर शहरातील महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आल्या. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य कुंभार बोलत होते. यावेळी महात्मा गांधी अमर रहे, नथुराम गोडसे मुर्दाबादच्या घोषणा देण्यात आल्या.

या प्रसंगी मराठवाडा जनता विकास परिषदेचे अध्यक्ष शिवाजीराव नरहरे, ज्येष्ठ समाजवादी नेते सूर्यप्रकाश धूत, राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे, शिवाजीराव शिंदे, ज्येष्ठ विचारवंत व साहित्यिक प्रा. शिवाजीराव जवळगेकर, प्रा.सुभाष भिंगे, ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य माधव गादेकर, ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य नागोराव कुंभार, प्राचार्य श्रीकांत गायकवाड, ॲड.शेखर हविले, डॉ. गणेश गोमारे, इंजिनियर व सामाजिक कार्यकर्ते बिराजदार, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सूर्यकांत वैद्य, अंनिसच्या रुकसाना मुल्ला, अनुराधा कांबळे, अनिल दरेकर, शिवाजी कांबळे आदीसह कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने हजर होते

# जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांच्या पुढाकाराने क्रीडा संकुलात स्वच्छता अभियान



**लातूर/प्रतिनिधी :** दसरा, महात्मा गांधी जयंती व धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांच्या पुढाकाराने जिल्हा क्रीडा संकुलात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. संकुल स्वच्छ, सुंदर व शिस्तबद्ध ठेवण्याचा संकल्प या उपक्रमातून करण्यात आला. कसगावडे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर क्रीडा संकुल परिसरात शिस्तीचे वातावरण निर्माण झाले आहे. पूर्वी विस्कळीत असलेली पार्किंग व्यवस्था सुधारून पेव्हर ब्लॉकच्या जागी पार्किंग करण्याचे आदेश त्यांनी दिले. तसेच मैदानात डीजे वाजवणे, गोंगाट करणे, आरडाओरडा करणे यावर बंदी घालून खेळाडूंना खेळासाठी योग्य व अनुशासित वातावरण उपलब्ध करून दिले. दसऱ्याच्या सुट्टीत अनेक अधिकारी कुटुंबासोबत वेळ घालवत असताना कसगावडे मात्र क्रीडा संकुलात येऊन स्वच्छता अभियान राबवत असल्याचे कौतुक सर्वत्र होत आहे. ''अधिकारी असावा तर असा'' अशा शब्दांत नागरिक त्यांचे गौरव करत आहेत. या स्वच्छता अभियानात दैनिक महावृत्तचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ (मुंबई) जिल्हा शाखा, लातूर) चे जिल्हा सरचिटणीस अशोक हनवते यांनीही सहभाग नोंदवला.

# महापारेषणतर्फे सेवा पंधरवड्यानिमित्त येऊरमध्ये विविध सामाजिक उपक्रम

## गोशाळेत चारावाटप, पर्यावरण संवर्धन व स्वच्छता अभियान




**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) अति उच्च दाब (संचलन व सुव्यवस्था), कळवा यांच्या वतीने अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांच्या हस्ते येऊर (जि.ठाणे) येथे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन ते राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती सेवा पंधरवड्यानिमित्त महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर विविध सामाजिक उपक्रम घेण्यात आले.

यामध्ये श्री. पशुरक्षक मंडळ ट्रस्टच्या गोशाळेत चारावाटप व स्वच्छता अभियान राबविण्यात आले. तसेच श्री. सदगुरू मंदिर ट्रस्टच्या बालकाश्रमाला भेट देऊन तेथील विद्यार्थ्यांच्या समस्या ऐकून त्यांना शालेय साहित्याचे वाटप, भेटवस्तू व परिसर स्वच्छता करण्यात आली.

पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण व परिसराची स्वच्छता करण्यात आली. एक पेड माँ के नाम हा उपक्रम राबविण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांना फळेवाटप, भेटवस्तू व तेथील परिसराची स्वच्छता करण्यात आली. अनाथाश्रमातील मुलांना पंखे व ट्युबलाईट साहित्य देण्यात आले. यावेळी श्रीमती सुचिता भिकाने यांनी गोशाळा, पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छतेबाबतचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून सांगितले.

याप्रसंगी अधीक्षक अभियंता श्री. विजय आवारे, सल्लागार श्री. किरण वडते, कार्यकारी अभियंता श्री. संतोष भुजबळ, श्री. मुकुंद पवार, श्री. विनय वासनिक, सहाय्यक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. इमामभाई सिद्दीकी, व्यवस्थापक श्रीमती वैशाली रामटेके, श्री. ललित वाघ, जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्यातील एक हजार ९८५ ग्राहकांच्या घरात सूर्य प्रकाश!

## प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचा लाभ घेत विजेबाबत स्वयंपुर्ण व्हा महावितरणचे आवाहन

**धाराशिव/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील अनेक वीजग्राहक छतावरील सौरऊर्जाकडे वळू लागले असून, ते स्वतःच स्वतःची वीज तयार करत आहेत. प्रधानमंत्री मोफत सूर्यघर योजना सर्वसामान्य नागरिकांसाठी फलदायी ठरू लागली आहे. सूर्यघर योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यातील तब्बल एक हजार ९८५ घरगुती वर्गवारीतील ग्राहक विजेबाबत स्वयंपूर्ण झाले आहेत. महावितरणकडून धाराशिव जिल्ह्यात प्रधानमंत्री सूर्यघर योजनेची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. या योजनेंतर्गत जिल्ह्यातील एक हजार ९८५ ग्राहकांनी घराच्या छतावर सौरऊर्जेचे संच बसवले आहे. यामध्ये धाराशिव विभागातील १५७२ वीजग्राहकांनी ५.६९ मेगावॅट क्षमतेचे तर तूळजापूर विभागातील केवळ ४१३ ग्राहकांनी १.५४ मेगावॅट क्षमतेचे सौरऊर्जेचे संच बसवले आहेत. दोन हजार ग्राहकांच्या छतावर सौर संच बसविण्याचे काम सुरू असून, लवकरच हे काम पूर्णत्वास येणार आहे.

काय आहे प्रधानमंत्री सूर्यघर योजना


प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत घराच्या छतावर सौरऊर्जा प्रकल्प बसवून वीजनिर्मिती केली जाते. घरगुती ग्राहकांच्या मदतीसाठी केंद्र शासनाने गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात ही योजना सुरू केली होती. त्यासाठी केंद्र सरकारकडून एक किलोवॅट क्षमतेच्या छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पासाठी तीस हजार रुपये, दोन किलोवॅट क्षमतेसाठी साठ हजार रुपये तर तीन किलोवॅट किंवा त्यापेक्षा अधिक क्षमतेसाठी ७८ हजार रुपये थेट अनुदान मिळते. या योजनेतील ग्राहकांना मोफत नेट मीटर देण्याचाही निर्णय महावितरणने घेतला आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांना ://.. या वेबसाईटवर नोंदणी करावी लागते. छतावरच्या सौरऊर्जा प्रकल्पात घराच्या गरजेपेक्षा अधिक वीज निर्माण झाल्याने वीजबिल शून्य होते.

# दिव्यांग कन्येच्या हस्ते मुख्यमंत्री सहायता निधीसाठी २१ हजारांची मदत !

**लातूर/प्रतिनिधी :** आंतरराष्ट्रीय कन्या दिवसाचे औचित्य साधून लातूर शहरातील संजय राजुळे यांनी आपली ०९ वर्षीय दिव्यांग मुलगी कु. साईश्रद्धा हिच्या हस्ते लातूरचे जिल्हाधिकारी वर्ष ठाकूर-घुगे यांच्याकडे मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत २१ हजारांचा धनादेश दिला आहे. अतिवृष्टी आणि पुरामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी ही मदत देण्यात आली. या उपक्रमाचे जिल्हाधिकाऱ्यांनी कौतुक करीत शेतकऱ्यांच्या मदतीसाठी नागरिकांनी पुढे येवून मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये योगदान देण्याचे आवाहन केले.

लातूर जिल्ह्यासह महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे शेती पिकं आणि





शेतजमिनीचे नुकसान झाले आहे. या संकट काळात शेतकऱ्यांच्या मदतीसाठी संजय राजुळे यांनी त्यांची ०९ वर्षीय दिव्यांग मुलगी कु. साईश्रद्धा संजय राजुळे हिच्या हस्ते मुख्यमंत्री सहायता निधीसाठी २१ हजार रुपयांचा धनादेश लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्याकडे सुपूर्द केला. याप्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, महापालिका आयुक्त मानसी यांची उपस्थिती होती.

आठ वर्षीय अधिराज वागदरे याने संकलित केली मदत

शेतकऱ्यांवर आलेल्या संकटाच्या बातम्या वृत्तपत्र आणि वृत्तवाहिन्यावरून पाहताना आपणही शेतकऱ्यांसाठी काहीतरी करायला पाहिजे, या भावनेतून लातूर शहरातील कातपूर रोडवर परिसरात राहणाऱ्या अधिराज माधवराव वागदरे (वय ८ वर्षे) याने आपल्या गल्लीतील नागरिकांना मदतीचे आवाहन करीत मदत संकलित केली. यासाठी त्याने अनोखी पेटी तयार करून त्यावर शेतकऱ्यांना मदतीचे आवाहन करणारे संदेश रेखाटले होते. त्याने यामाध्यमातून संकलित केलेली रक्कम मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये जमा करण्यासाठी थेट अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांच्याकडे जमा केली. लातूर येथील युनिक इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये शिकणाऱ्या अधिराजची प्रेरणा घेवून इतरांनीही शेतकरी बांधवांच्या मदतीसाठी पुढे येवून मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये मदत करण्याचे आवाहन अपर जिल्हाधिकारी श्रीमती करमरकर यांनी केले.

## साथींच्या आजारापासून मुलांना दूर ठेवा

बालकांपासून वृद्धांपर्यंत सर्वांचेच आरोग्य बिघडलेले दिसते. शहरात मलेरियाचे डास खूप मोठ्या प्रमाणावर झाले असले तरी कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून डास निर्मुलनासाठी कोणतीही परिणामकारक प्रतिबंधात्मक उपाययोजना केलेली दिसत नाही. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या आरोग्याची स्वत:च काळजी घेणे आवश्यक आहे.कल्याण शहरासह ग्रामीण भागात पाण्यापासून होणाऱ्या आजारांचा धोका वाढला आहे. कल्याण महापालिकेच्या रुख्मिणीबाई रुग्णालायाच्या सर्व केंद्रात सर्दी ताप व पावसाळी आजारावर भरपूर औषधे असल्याचा महापालिकेच्या आरोग्य विभागाने दावा केला आहे. महापालिका रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांमध्ये श्रीमलंगपट्टी मुरबाड, शहापूर, भागातील रुग्ण अधिक आढळतात. कल्याण, उल्हासनगर व त्यांच्या भोवतालच्या ग्रामीण भागात थंडी-तापाचे रुग्ण आढळले असले तरी त्यात पाण्यापासून होणाऱ्या तापाची संख्या अधिक आहे.

## पिंडाला न शिवलेला कावळा



काव-काव करणारा कावळा पिंडाला शिवत नाही' आभाळात एकटाच फिरणारा तो काळा पक्षी, जणू काही शोधतोय, एक ओळख, एक संकेत. पण पिंडाला शिवत नाही आणि मग घराच्या ओसरीवर, वाड्याच्या अंधाऱ्या खोलीत, अडकून राहतात आठवणींचे धागे. नात्यांचे गुंते, जे कधीच पूर्ण न झालेले. कोणीतरी हळूच म्हणतं, कावळा पिंडाला शिवला नाही म्हणजे पितर अजूनही तृप्त झाले नाहीत... त्या एका वाक्यात किती काळजी, किती श्रद्धा आणि किती अदृश्य भय दडलेलं असतं. पण 'श्राद्ध' हे केवळ विधी नाहीत. हे स्मरण आहे. हे ऋण आहे. हा संवाद आहे त्यांच्याशी, ज्यांचं अस्तित्व आपल्या रक्तात आहे, पण ज्यांचे स्पर्श आता केवळ मनाच्या गाभ्यात उरलेले आहेत त्यांच्याकरिता. ते पंधरा दिवस म्हणजेच 'पितृपंधरवडा' ज्याला आपण म्हणतो श्राद्ध. या काळात घरात एक वेगळी शांतता असते. ती गूढ नसते तर ती असते आदराची. तीळ, तांदूळ, कुशा यांच्याद्वारे मंत्रांच्या स्वरात एक अदृश्य पूल बांधला जातो भूतकाळाशी, पूर्वजांशी आणि आपल्या स्वतःच्या मुळाशी. श्राद्ध म्हणजे अंधश्रद्धा नाही. ती एक संस्कृती आहे. ती आहे एक अंतःकरणाची प्रक्रिया. ती एक स्मरणयात्रा आहे, 'ज्यांनी आपल्यासाठी आयुष्य घालवलं, त्यांचं स्मरण करण्याची'. जगभरात अनेक संस्कृतींमध्ये पूर्वजपूजेच्या परंपरा आहेत. पण आपल्या धर्माने त्याला एक शिस्तबद्ध, लवचिक आणि भावनिक रूप दिलं आहे. ज्यांच्याकडे साधनं नाहीत, त्यांच्यासाठीही श्रद्धेचे मार्ग खुले आहेत. कारण श्रद्धा ही साधनांवर नव्हे, मनाच्या गाभ्यावर अवलंबून असते. श्राद्ध हा केवळ एक धार्मिक विधी नाही, ती एक अंतःकरणाची यात्रा आहे. जिथे माणूस स्वतःच्या मुळाशी, रक्तात वाहणाऱ्या आठवणींच्या गाभ्याशी आणि अंतराळाच्या पलीकडील अस्तित्वाशी संधान बांधतो. पिंडाला न शिवलेला कावळा हे दृश्य केवळ एक संकेत नाही, तर तो एक गूढ संदेश आहे, अपूर्णतेचा, अडकलेल्या ऋणांचा आणि स्मरणाच्या अदृश्य गाठींचा. जगभरातल्या संस्कृतींमध्येही हीच भावना वेगवेगळ्या रूपांत प्रकट होते, कधी थडग्यांवर ठेवलेल्या मेणबत्त्यांमध्ये, कधी रंगीबेरंगी वेदिकांमध्ये, तर कधी ढोलवादनात गुंफलेल्या आर्ततेमध्ये. चीनच्या कागदी पैशांपासून ते मेक्सिकोच्या साखरेच्या कवट्यांपर्यंत, कोरियाच्या अर्पणांपासून ते मंगोलियाच्या ओवो वेदिकांपर्यंत सर्वत्र एकच धागा आहे, मृत्यूच्या पलीकडून येणाऱ्या स्मरणाचा आणि त्या स्मरणाला अर्पण करण्याच्या मानवी प्रयत्नांचा. आपल्या सनातन धर्माने या स्मरणयात्रेला एक संहिता दिली आहे, शिस्तबद्ध, लवचिक आणि अंतःस्पर्शी अशी. ज्यामुळे श्रद्धा ही केवळ विधी न राहता, ती एक अंतःस्पर्श बनली. श्रद्धेच्या प्रवाहाला एक विधिसंकेत मिळाला आहे, ज्यामुळे ती भावना कृतीत उतरते. श्राद्ध म्हणजे एक अंतःस्पर्श आहे, ज्याच्या स्पंदनात स्मरण, ऋण आणि प्रतीक्षा गुंफलेली आहे ते एक ऋण आहे आणि एक अदृश्य पूल देखील ज्याच्या दुसऱ्या टोकाला आपले पितर आहेत, शांततेत, प्रतीक्षेत आणि आपण त्यांच्या स्मरणात गुंतलेले. हा पूर्वजांच्या स्मरणासाठी आपल्या धर्माने एक संस्कारपथ आखून दिला आहे, ज्याने श्रद्धेला दिशा मिळते ज्यात श्राद्ध ही केवळ एक भावना राहत नाही तर ती एक अनुक्रमधारा आहे, ज्यामुळे पितरांच्या स्मरणाची प्रक्रिया सुसंगत होते. ही एक आचारसंहिता आहे, ज्यामुळे श्रद्धा ही केवळ अंतःकरणात न राहता, कृतीत उतरते, अधिक गंभीर आणि शिस्तबद्ध अशी. हा आपल्या पूर्वजांनी मृत पूर्वजांच्या स्मरणविधीसाठी एक नकाशा तयार केला आहे, ज्यामुळे प्रत्येक पिढी त्या मार्गावर चालू शकते. अधिक रूपकात्मक आणि दृश्यात्मकरीत्या. येथे श्रद्धेला एक अनुक्रम दिला आहे, ज्यामुळे ती अराजक न राहता, सुसंगत आणि सन्मानपूर्वक साकार होते. भावना आणि शिस्त यांचं संतुलन देखील राहते ते श्राद्ध विधीमुळेच. अखेरीस माझ्याच शब्दात सांगायचे झाले तर, पितृणां स्मृतिरूपेण, मंत्रध्वन्यां तिलैः सह। अदृश्ये संधि पूजायां, जीवने दीपकं स्मृतम्।। याचा अर्थ पूर्वजांची आठवण ही केवळ स्मृती नसते, एक अदृश्य ध्वनी, जो काळाच्या पलीकडून येतो आणि आपल्या अंतःकरणात गुंफला जातो. तो ध्वनी मंत्रांच्या स्वरात विरघळलेला असतो, तिळाच्या कणकणात मिसळलेला, जणू त्या प्रत्येक अर्पणात एक संवाद घडत असतो जग आणि परलोक यांच्यात. ही पूजा म्हणजे एक संधान आहे, जे शब्दांच्या पलीकडचं आहे. जिथे विधींच्या मर्यादा संपतात आणि श्रद्धेची गूढ वाट सुरू होते. त्या स्मृतींना आपण अर्पण करतो ते केवळ अन्न नव्हे, तर आपलं मन, आपली ओळख आणि आपली कृतज्ञता असते. मग ती स्मृतीच जीवनात एक दीपक बनते दिशा दर्शविणारा, अंधारात उजळणारा आणि काळाच्या प्रवाहात आपल्याला आपल्या मुळाशी जोडणारा. हे दीपक केवळ प्रकाश देत नाही, तर तो एक गूढ स्पर्श देतो ज्यामुळे आपण जिवंत असतो, पण स्मरणात गुंतलेले असतो आपल्या पितरांच्या. श्राद्ध म्हणजे हेच एक अंतःस्पर्श, एक स्मरण आणि एक उजळणारी नाळ, जी काळाच्या पलीकडूनही आपल्याला स्पर्श करत राहते.

## समाजाला आजही नकोशीच! का?





सुंभ जळाला, तरी पीळ कायम' अशी मराठीत जी म्हण आहे, ती आज आपल्या समाजाला तंतोतंत लागू पडते. गोष्टी कालानुरूप फार वेगाने बदलत असतात. बदलत्या वास्तवाची जाणीव प्रत्येकालाच असते. सभोवतालच्या वास्तवानुसार बदलायला हवं; त्याशिवाय तरुणोपाय नाही याचंही भान असतं. पण, माणूस बदलाला सहजासहजी तयार होत नाही. परंपरा आणि संस्कारातून आलेल्या समजुतींबाबत तर हे जडत्व खूपच असतं. कालानुरूप मांडल्या जाणाऱ्या प्रागतिक विचारांना सुरुवातीला विरोधच असतो. त्यातली अपरिहार्यता लक्षात आल्यानंतर जेवढं आवश्यक, भौतिक जगण्याला उपयोगी - तेवढंच स्वीकारलं जातं. केवळ तेवढ्या स्वीकारावरून स्वतःचं प्रागतिक म्हणून समर्थनही केलं जातं. पण, ते मुळातून नसल्याने, जे स्वीकारलं ते वरवरचं असल्याने त्याचा लाभ तर होत नाहीच; पण फरपट मात्र होते. स्त्रीभ्रूण हत्येविरोधात सरकारी पातळीवर बऱ्याच मोहिमा झाल्या. स्त्री सुधारकांनी वेगवेगळ्या पातळीवर प्रबोधन करून झालं. त्याचे धोके सांगून झाले. ज्या कारणासाठी कुटुंबाला मुलगी ओझं वाटते, ती कारणं संपवण्यासाठी सरकारने विविध योजना आखल्या.

महाराष्ट्रासारख्या राज्यात या योजनांची अंमलबजावणी शंभर टक्के दिसते. कागदावर लाभार्थींच्या याद्याही आहेत. पण, त्या योजनांचा लाभ घेतल्यानंतर मानसिकतेत किती फरक झाला? तर, अगदी जेमतेम. मग त्या योजनांचा उपयोग काय झाला? ज्या समाजसुधारकांनी समाजप्रबोधनासाठी आयुष्य वेचलं, सरकारने मोहिमांच्या प्रसिद्धीवर कोट्यवधींचा खर्च केला, प्रत्येक योजनेतूनही कोट्यवधींचा लाभ दिला, त्याचा उपयोग काय झाला? सगळं पालथ्या घड्यावर पाणी? मुली शिकल्या, त्या स्वावलंबी झाल्या, शिक्षणाने त्यांच्या आणि कुटुंबीयांच्या बौद्धिकतेत-मानसिकतेत फरक पडला, तर त्याचा लाभ स्त्रियांकडे बघण्याच्या दृष्टिकोनात होईल. 'नकोशी' मुलगी 'हवीशी' होईल. 'मुलगी शिकली, प्रगती झाली'सारख्या घोषणांनी संपूर्ण राज्यात त्यासाठीच भिंती रंगवल्या होत्या. प्रसिद्धी माध्यमांतून जाहिराती दिल्या गेल्या होत्या. मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावं, 'मुलाचं, की घरातल्या मुलीचं शिक्षण?' यात मुलींचं शिक्षण बाजूला पडू नये, यासाठी केंद्र सरकारने' बेटी बचाव-बेटी पढाव' ही महत्त्वाकांक्षी योजना आखली. त्यासाठी चांगल्या निधीची तरतूद केली. योजनेचा निधी केंद्रातून राज्यात, राज्यातून जिल्ह्याजिल्ह्यांत गेला, पण त्यानंतर तिथे तो खर्चच झाला नाही, अशी माहिती केंद्र सरकारच्या महिला आणि बालविकास विभागाच्या एका अहवालात देण्यात आली आहे. अहवालात म्हटलं आहे, की योजनेच्या गेल्या अकरा वर्षांत मूळ तरतुदीच्या एक तृतीयांश निधीही कधी खर्च झाला नाही! सन २०२४-२५ मध्येही ३१ डिसेंबरपर्यंत एकूण योजनेच्या फक्त १३ टक्के निधीच खर्च झाला आहे!! हा आतापर्यंतचा सर्वात कमी खर्च आहे. देशाच्या तुलनेत महाराष्ट्रात परिस्थिती बरी आहे. पण, ज्या राज्यात याची सर्वाधिक गरज आहे, तिथेच अगदी खालच्या स्तरावर उदासीनता दिसते आहे. अगदी खालच्या स्तरावर असलेली उदासीनता ही प्रशासकीय पातळीवरची उदासीनता असते. या स्तरावरील अधिकारी आणि कर्मचारी वर्ग म्हणजे समाजाच्या पारंपरिक मानसिकतेचं प्रतीक असतो. त्यांच्या मानसिकतेवर आणि कार्यक्षमतेवरच कोणत्याही योजनेची अंमलबजावणी आणि यश अवलंबून असतं. त्यामुळे, योजनेच्या माध्यमातून समाजात कोणताही बदल घडवायचा असतो, तेव्हा या पातळीवरच्या प्रशासनिक यंत्रणेचं प्रबोधन, संवेदनीकरण फार महत्त्वाचं असतं. या योजनेच्या अंमलबजावणीत राष्ट्रीय पातळीवर कुठे कमतरता दिसते आहे, ते शोधून तिथल्या कर्मचारी वर्गाचे प्रशिक्षण वर्ग तातडीने आयोजित केले पाहिजे. त्यांच्या दृष्टिकोनात बदल होणार नाही, तोपर्यंत योजनेच्या अंमलबजावणीला गती येणार नाही. गती येणार नाही, तोपर्यंत तिची प्रभावी अंमलबजावणी होणार नाही. अंमलबजावणी झालीच नाही, तर मुलींच्या शिक्षणाला, तिच्या आत्मनिर्भर होण्याला जो रेटा द्यायचा आहे, तो मिळणार नाही. हा रेटा प्रत्यक्ष कुटुंबापर्यंत पोहोचलाच नाही, तर मुलगी 'नकोशी'च राहील आणि त्यामुळे स्त्रीभ्रूणहत्या होतच राहतील. त्यातून समाजाचा तोल बिघडेल आणि नवे गंभीर प्रश्न आणखी गंभीर होत जातील.

हुंडा प्रथा ही मुलगी 'नकोशी' होण्याचं एक महत्त्वाचं कारण आहे, हे लक्षात घेऊन हुंडाविरोधी चळवळी उभ्या राहिल्या. शाळा पातळीपर्यंत त्याबाबतचं प्रबोधन केलं गेलं. हुंडा प्रथेला प्रतिबंध करणारे कायदेही केले गेले. विवाहानंतर हुंड्यासाठी त्रास दिला गेला, तर त्यासाठीही कडक कायदा केला गेला. विवाहित तरुणी ज्या कोणाचं आरोपी म्हणून नांव घेईल, त्याच्या थेट तुरुंगवारीची तरतूद कायद्यात केली गेली. अनेक घटनांत कुटुंबच्या कुटुंब तुरुंगाची हवा खाऊन आली. त्याने हुंडाबळीच्या पूर्वीच्या संख्येत घट झाली. पण, थोडीशीच. त्या प्रथेचं निर्मूलन अजूनही झालेलं नाही. मुंबईसारख्या पुढारलेल्या शहरात तर हुंड्याबाबतच्या तक्रारीत ४०९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. हुंड्यासाठी सासरी शारीरिक व मानसिक छळ होत असल्याच्या २०२२ मध्ये जेवढ्या तक्रारी पोलिसांत नोंदवल्या गेल्या, त्यात २०२३ मध्ये ४०९ टक्क्यांनी वाढ आहे! अपहरणाच्या गुन्ह्यांतही देशात दिल्ली खालोखाल मुंबई दुसऱ्या क्रमांकावर आहे. बलात्काराच्या गुन्ह्यांत मुंबईचा क्रमांक देशात तिसरा आहे. पहिला क्रमांक दिल्लीचा आणि दुसरा जयपूरचा आहे. महिलांची प्रतिष्ठा, सुरक्षितता आणि त्यांचं उन्नयन यासाठी देशपातळीवर प्राधान्याने मोहीम उघडण्याची गरज आहे. मुंबईकरांनीच त्यासाठी पुढाकार घेणं योग्य ठरेल.

## डॉक्टर टीप्स

**मुलांना चांदीच्या भांड्यात जेवू घाला, फायदे जाणून व्हाल हैराण....**

### हेल्थ टिप्स



ह्यात समाविष्ट अँटी मायक्रोब्रियल शरीरास रोगांपासून रक्षण करते. यामुळे शरीरात कुठलेही संक्रमण होत नाही.
२ शरीरास थंड ठेवते: चांदी थंड धातू असल्याने बाळाच्या आरोग्यास चांगली असते.शरीरातील उष्णतेला कमी करते. त्यामुळे बाळ शांत राहतं, उग्र किंवा तामसी होत नाही. उन्हाळ्यात चांदीचा ताटात जेवू घालावे,आणि चांदीचा ग्लासा मधून पाणी किंवा दूध पाजावे.३ शरीरातील रोग प्रतिरोधक शक्ती वाढीस होते : लहान मुलं नाजूक असतात त्यामुळे त्यांची शरीरातील रोग प्रतिरोधक शक्ती कमकुवत असते. ते लवकर आजारी पडतात. चांदीचा वापर केल्याने या धातूचे काही अंश

(क्रमशः)




## विनोद

**शिक्षक : आकाशातील वीज आणि घरगुती वीज यात फरक काय?**
**विद्यार्थी : आकाशातल्या विजेचे बील येत नाहीत.**

## संदेश

Doctor: roz hotel mein khaane se hee aapko ulcer hui hai?
Patient: to aaj se mein ghar ko parcel leke jaaunga

## सुविचार

**उदात्त वृत्तीचा मनुष्यच उदात्त व्यक्तींना आकर्षून घेतो.**

**- गटे**




संस्कृत सुभाषित

**अनागतविधाता च प्रत्युत्पन्नमतिश्च य:**
**द्वावेव सुखमेधेते दीर्घसूत्री विनश्यति।।**
**(शांतीपर्व, अध्याय १३७, ेक १ महाभारत)**

**अर्थ :** येणाऱ्या संकटाची आधी तरतूद करून ठेवणारा व प्रसंग पडताच ज्याला युक्ती सुचते तो अशा दोन प्रकारच्या माणसांनाच सुखप्राप्ती होते. दीर्घसूत्री सर्वथा नाश पावतो.

## मनोरंजक महाशब्दकोडे

कोड क्र. १८



### आडवे शब्द

१. दिवाळीपासून सुरु
७. पाढे, श्लोक इ. पाठांतर
११. गीते
१२. लागू आडनावाच्या नटीचे नाव
१४. सुंदर
१५. तरंगणारा थर
१६. खानदान
१७. दुष्ट, नीच
२०. मऊ
२२. बैठे लाकडी आसन
२३. सदन
२४. प्रगतीशील
२५. वस्त्र विणण्याचे यंत्र
२६. सुंदर, मस्त
२७. आचारी
२९. तेज
३०. पाणी
३१. कडुलिंब (हिंदी)
३३. मोठी सुई
३४. थोडक्यात सप्रेम नमस्कार विनंती विशेष
३७. आठवण
३८. बैलाच्या गळ्यात बांधायची दोरी
४०. साठ वर्षांचे झाल्यावर बुद्धी चळते या अर्थाचा वाक्प्रचार
४२. साधना
४४. माझे
४५. कबुतर
४६. बंगाल
४८. दात
५०. थंडगार
५१. पराभव
५३. लहान वयात काम करणारा
५४. शिक्षणासाठी मुलांची राहण्याची केलेली व्यवस्था
५६. अंतराळवाहन
५७. आचार्य अत्रे यांचे दैनिक
५८. महाभारतातील पाच भाऊ
६०. टप्पा
६१. भारत
६२. माळ
६३. कवितेतील परिच्छेद
६४. अधिकमास
६६. बागवान
६७. बाणांचा वर्षाव
७०. लेखणी
७३. चुलता
७५. पंजाबातील एक नदी
७८. संतोष, तृप्ती
७९. कुमक
८०. फुटक्या नशीबाचा
८१. जिवाची अस्वस्थता

### उभे शब्द

२. मरूभूमी, नदीकाठचा परिसर
३. स्वस्थ, गप्प
४. अंघोळीची जागा
५. उपवासाचे धान्य
६. माल, वस्तू
८. लक्ष्मी
९. चेहरा
१०. नोकरदार
१३. ओठ
१५. निरीक्षक
१८. कृष्णसखी
१९. दहावी रास
२१. घट्ट विळखा
२३. गर्द
२७. खाणीतील मजूर
२८. नवऱ्याचे वडील
३२. मृत
३५. विश्रांती
३६. मतिमान
३९. युद्ध
४१. सापाचा भाऊ
४३. दुसऱ्याच्या जागी स्वत:ला कल्पिणे
४५. कबुतर
४६. पाण्याची सार्वजनिक जागा
४७. हाल, कष्ट
४९. दाबून टाकणे
५१. महिना
५२. सापकिरडू इ.
५५. आयुष्यातील संसार करण्याचा काळ
५७. स्निग्ध औषध
५९. फांदी
६०. मोठे पाप
६१. हिंसा करणारा
६३. कसबी, कुशल
६५. वेल
६६. एका पाठी एक
६८. अर्क
६९. मऊ, रेशमी
७१. शेजारी, जवळ
७२. चिंतन
७४. ध्येय
७६. लोक
७७. एक गड्डा पानभाजी
७८. सारखे

### आडवे उत्तर

१.हिवाळा उन्हाळा पावसाळा ७.परवचा ११.गाणी १२.रीमा १४.मादक १५.तवंग १६.घराणे १७.नराधम २०.नरम २२.पाट २३.घर २४.सुधारक २५.माग २६.छान २७.खानसामा २९.रया ३०.नीर ३१.नीम ३३.दाभण ३४.सनविवि ३७.सय ३८.कासरा ४०.साठी बुद्धी नाठी ४२.तप ४४.मम ४५.पारवा ४६.वंग ४८.रद ५०.गारढोण ५१.मात ५३.बालकामगार ५४.वसतिगृह ५६.यान ५७.मराठा ५८.पांडव ६०.मजल ६१.हिंदुस्थान ६२.हार ६३.कडवे ६४.मलमास ६६.माळी ६७.शरपात ७०.कलम ७३.काका ७५.सतलज ७८.समाधान ७९.रसद ८०.कमनशिबी ८१.तगमग

### उभे उत्तर

२.वाळवंट ३.उगा ४.न्हाणीघर ५.वरी ६.सामानसुमान ८.रमा ९.वद १०.चाकरमानी १३.अधर १५.तपासनीस १८.राधा १९.मकर २१.मगरमिठी २३.घनदाट २७.खाणकामगार २८.सासरा ३२.मयत ३५.विसावा ३६.बुद्धिवंत ३९.समर ४१.नाग ४३.परकायाप्रवेश ४५.पाणवठा ४७.आबाळ ४९.दमन ५१.माह ५२.जनावर ५५.गृहस्थाश्रम ५७.मलम ५९.डहाळी ६०.महापातक ६१.हिंसक ६३.कलाकार ६५.लता ६६.मागोमाग ६८.रस ६९.तलम ७१.लगत ७२.मनन ७४.ध्येय ७६.जन ७७.कोबी ७८.सम

# चंदेरी दुनिया



## कतरिना कैफने दिराचा वाढदिवस केला साजरा

**मुंबई** –बॉलिवूड अभिनेत्री कतरिना कैफ आणि विकी कौशल यांनी अलीकडेच त्यांच्या चाहत्यांना एक गोड बातमी दिली होती. गरोदरपणाची घोषणा केल्यानंतर हे जोडपे खूप चर्चेत आले आहेत. चाहते कतरिनाच्या गरोदरपणाबद्दल वारंवार अंदाज लावत होते आणि अखेर या स्टार जोडप्यानं त्यांच्या चाहत्यांना ही आनंदाची बातमी दिली. आता, विकी आणि कतरिना लवकरच त्यांच्या पहिल्या मुलाचे पालक बनण्याची तयारी करत आहेत.

दरम्यान कतरिना कैफ तिच्या गरोदरपणाची घोषणा झाल्यानंतर पहिल्यांदाच दिसली आहे. कतरिनानं तिचा दिर सनी कौशलचा वाढदिवस साजरा केला. आता या सेलिब्रेशनमधील कतरिना कैफचा फोटो समोर आला आहे.

कतरिना कैफची पहिली झलक : अभिनेता सनी कौशलनं २८ सप्टेंबर रोजी त्याचा ३६वा वाढदिवस साजरा केला. या वाढदिवसाच्या पार्टीत त्याचे जवळचे मित्रही उपस्थित होते. मिनी माथुरनं आता सनी कौशलच्या वाढदिवसाच्या सेलिब्रेशनचा एक फोटो शेअर केला आहे, ज्यामध्ये कतरिना कैफ असल्याची दिसत आहे. फोटोमध्ये आई होणारी कतरिना कैफच्या चेहऱ्यावर स्मित हास्य आहे. शेअर केलेल्या फोटोमध्ये मिनी आणि कतरिना कैफची बहीण इसाबेल दिसत आहेत. या फोटोमध्ये कतरिनानं लाल रंगाचा ड्रेस परिधान केला आहे. तसेच फोटोमध्ये अभिनेत्रीच्या चेहऱ्यावर गरोदरपणाचा आनंद असल्याचाही दिसत आहे.

दिर सनी कौशलच्या वाढदिवसानिमित्त कतरिना कैफ (दिर सनी कौशलच्या वाढदिवसानिमित्त कतरिना कैफ (मिनी माथुर आयजी स्टोरी))

कतरिना कैफ आणि विकी कौशलची गरोदरपणाची घोषणा : गेल्या आठवड्यातच कतरिना कैफ आणि विकी कौशल यांनी एका संयुक्त इंस्टाग्राम पोस्टद्वारे गरोदरपणाची घोषणा केली. शेअर केलेल्या फोटोमध्ये कतरिना कैफचा बेबी बंपला विकी कौशल प्रेमानं स्पर्श करत होता. या पोस्टवर चाहते आणि सेलिब्रिटींनी शुभेच्छांचा वर्षाव केला. या जोडप्यानं गरोदरपणाची घोषणा करताना आपल्या पोस्टमध्ये लिहिलं होतं, 'आम्ही आनंद आणि कृतज्ञतेनं भरलेल्या हृदयांसह आमच्या आयुष्यातील सर्वोत्तम अध्याय सुरू करण्याच्या मार्गावर आहोत.' लग्नाच्या चार वर्षांनंतर हे जोडपं त्यांच्या पहिल्या मुलाची अपेक्षा करत आहे. ९ डिसेंबर २०२१ रोजी राजस्थानमध्ये या जोडप्याचं भव्य लग्न झालं होतं.



## सत्य घटनेवर आधारित ही फिल्म
## बॉक्स ऑफिसवर ठरलेली हिट, कमावलेले ९०.३६ कोटी

मुंबई–बॉलिवूडमध्ये काही चित्रपट असतात जे प्रेक्षकांच्या मनावर खोल–वर छाप सोडतात, आणि 'नीरजा' चित्रपट यातील एक आहे. ही फिल्म सत्य घटनेवर आधारित असून २०१६ मध्ये प्रदर्शित झाली होती. बॉक्स ऑफिसवर हिट ठरलेल्या या चित्रपटाने ९०.३६ कोटींची कमाई केली आणि सोनम कपूरच्या दमदार अभिनयाला दोन्ही राष्ट्रीय पुरस्कारांसह अनेक पुरस्कार मिळाले आहेत. बॉलिवूड अभिनेत्री आणि अनिल कपूरची लेक सोनम कपूर या २०१६ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'नीरजा' चित्रपटामुळे आजही चाहत्यांच्या आठवणीत ताजी आहे. हा चित्रपट सच्च्या घटनेवर आधारित असून बॉक्स ऑफिसवर हिट ठरला होता.

एकूण ४३ पुरस्कार, राष्ट्रीय पुरस्कार 'नीरजा' हा चित्रपट एअर हॉस्टेस नीरजा भनोत यांच्या जीवनावर आधारित आहे. हा चित्रपट २०१६ मध्ये प्रदर्शित झाला होता आणि यात सोनम कपूरने नीरजाची भूमिका साकारली होती.




### जिंकलेले दोन नॅशनल अवॉर्ड

सोनम कपूरने नीरजाचा निडर आणि धैर्यशील व्यक्तिमत्व प्रेक्षकांसमोर अगदी चपखल साकारले. या चित्रपटात शबाना आजमी, योगेंद्र टिक्कू आणि जिम सरभ यांसारखे तगडे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकेत दिसले. चित्रपटाच्या यशाबद्दल बोलायचं झालं, तर घ्ं नुसार सोनम कपूरला या चित्रपटासाठी एकूण ४३ पुरस्कार मिळाले, त्यात स्पेशल मेन्शन बेस्ट एक्ट्रेसचा पुरस्कारही होता. चित्रपटाला बेस्ट फीचर फिल्म हिंदीसाठी राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. या यशामुळे सोनमच्या अभिनयाची आणि चित्रपटाच्या कथानकाचीही मोठ्या प्रमाणात दखल घेतली गेली.बॉक्स ऑफिसवरही 'नीरजा' हिट

'नीरजा'ला बॉक्स ऑफिसवरही चांगली कामगिरी मिळाली. इेदजषषळलशखप–वळर.ले नुसार, या चित्रपटाचा बजेट २८ कोटी रुपये होता, तर भारतात या चित्रपटाने ९०.३६ कोटींची कमाई केली. घ्ं वर चित्रपटाची रेटिंग ७.६ आहे, जी दर्शवते की प्रेक्षकांनी आणि समीक्षकांनी चित्रपटाचे कौतुक केले.चित्रपटाचे दिग्दर्शन राम माधवानी यांनी केले असून त्यांचा दृष्टीकोन आणि कथा सांगण्याची शैली प्रेक्षकांना खूप भावली. 'नीरजा' हा चित्रपट धैर्य, साहस आणि निडरतेचा एक अप्रतिम नमुना आहे. सोनमने नीरजाचा प्रत्येक भाव आणि संघर्ष प्रेक्षकांसमोर अत्यंत नैसर्गिक पद्धतीने आणला. जर तुम्ही 'नीरजा' पाहिली नसेल, तर ही चित्रपट कथा पाहण्यासारखी आहे. साहस आणि धैर्याची खरी कहाणी प्रेक्षकांसमोर येते. हा चित्रपट जिओ हॉटस्टारवर उपलब्ध आहे, त्यामुळे तुम्ही लवकरच नीरजाच्या धैर्याची कहाणी अनुभवू शकता. सोनमच्या अभिनयामुळे 'नीरजा' आजही बॉलिवूडमध्ये एक प्रेरणादायी आणि लक्षवेधी चित्रपट म्हणून ओळखला जातो. सच्च्या घटनेवर आधारित हा चित्रपट केवळ मनोरंजन नाही तर प्रेक्षकांसाठी प्रेरणा देणारा चित्रपट आहे.

## सैफचा धक्कादायक खुलासा


मुंबई–बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानने त्याच्या अभिनयाच्या सुरुवातीच्या काळातील एक अत्यंत धक्कादायक अनुभव नुकताच एका मुलाखतीत सांगितला आहे. सैफने खुलासा केला की, त्याला जेव्हाही पैसे मिळायचे, तेव्हा एका महिला निर्मातीची विचित्र आणि अील मागणी त्याला पूर्ण करावी लागत असे. आजच्या घडीला सैफ अली खान बॉलिवूडमधील एक स्टार अभिनेता म्हणून ओळखला जातो. त्याचे चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक असतात आणि समीक्षकही त्याचे कौतुक करतात. ३० वर्षांच्या आपल्या कारकिर्दीत त्याने अनेक हिट चित्रपट दिले आहेत, पण त्याचा सुरुवातीचा प्रवास इतका सोपा नव्हता. सैफ अली खान हा पतौडी घराण्यातील आहे. त्याचे वडील मन्सूर अली खान पतौडी हे माजी भारतीय क्रिकेटपटू होते, तर आई शर्मिला टागोर त्यांच्या काळातील टॉप अभिनेत्री होत्या. यामुळे इंडस्ट्रीतील त्याचा प्रवास सोपा वाटत असला तरी, त्याने करिअरमध्ये खूप मेहनत घेतली. अलीकडेच एका मुलाखतीत त्याने सुरुवातीचे दिवस आठवले, जेव्हा त्याला मुख्य भूमिका असलेले चित्रपट मिळत नव्हते. सैफने सांगितले, मफ्मी माझ्या करिअरमध्ये सेकंड लीड किंवा थर्ड लीड अशा भूमिका केल्या. काही चित्रपट चांगले होते, ज्यामुळे माझा गाडा चालत राहिला. पण एक वेळ अशी आली की, एकामागून एक चित्रपट खूप वाईट फ्लॉप झाले.फ्फ याच दरम्यान, एका महिला निर्मातीने त्याला आठवड्याला १,००० रुपये देण्याची ऑफर दिली होती. पण त्या बदल्यात ती निर्माती सैफच्या गालावर दहा वेळा पप्पी (किस) करण्याची मागणी करायची, असा धक्कादायक खुल–ासा सैफने केला. सैफ पुढे म्हणाला की, ९० चा दशक त्याच्यासाठी एका प्रॅक्टिस सेशनसारखा होता, जिथे तो खूप काही शिकत होता. मफ्लोक म्हणायचे की, तुला खूप संधी मिळाल्या, तू नशीबवान आहेस. पण खरं सांगायचं तर मला इंडस्ट्रीतील सर्वात चांगले चित्रपट मिळत नव्हते किंवा मी मुख्य भूमिकेत नव्हतो,फ्फ असेही सैफने स्पष्ट केले. सैफच्या करिअरला २००१ साली आलेल्या मदिल चाहता हैफ या चित्रपटाने कलाटणी मिळाली. या चित्रपटानंतर त्याचा प्रवास वेगाने पुढे सरकला. त्याला त्याच्या कारकिर्दीतील पहिले आणि एकमेव अभिनय श्रेणीतील राष्ट्रीय पुरस्कार २००४ साली महम तुमफ चित्रपटासाठी मिळाला. यानंतर २००६ मध्ये त्याने मओमकाराफ चित्रपटातून समीक्षकांमध्येही आपले स्थान पक्के केले. सैफ अली खानच्या आगामी प्रोजेक्ट्सबद्दल बोलायचे झाल्यास, तो लवकरच अक्षय कुमारसोबत प्रियदर्शन दिग्दर्शित महैवानफ या चित्रपटात दिसणार आहे. याशिवाय, तो मरेसफ फ्रँचायझीच्या चौथ्या भागातही दिसणार आहे. दरम्यान, सैफच्या या खुलाशामुळे चित्रपटसृष्टीतील सुरुवातीच्या काळात बाहेरील कलाकारांना कोणत्या प्रकारच्या विचित्र मागण्यांना तोंड द्यावे लागते, यावर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.



## दशावताराचा बॉक्स ऑफिसवर धमाका कायम

मुंबई–सप्टेंबर –मराठी चित्रपटसृष्टीत मदशावतारफ ने जोरदार घोडदौड केली आहे. १२ सप्टेंबर रोजी प्रदर्शित झालेला हा सिनेमा तिसऱ्या आठवड्यात प्रवेश करूनही थिएटरमध्ये प्रेक्षकांना आकर्षित करतोय. पहिल्या आठवड्यापासूनच या चित्रपटाने चांगली कमाई केली असून, आता तो २० कोटींच्या टप्प्याच्या अगदी जवळ पोहा–चला आहे.

पहिल्या आठवड्यात मदशावतारफ ने तब्बल ९.२० कोटींचा गल्ला जमा केला. दुसऱ्या आठवड्यात थोडी घसरण झाली असली तरीही ९.२५ कोटींची कमाई झाली. तिसऱ्या आठवड्यात शुक्रवारची कमाई अवघी ४५ लाख इतकी होती, जी चित्रपटाच्या आतापर्यंतच्या प्रवासातील सर्वात कमी रक्कम होती. मात्र शनिवारी (२७ सप्टेंबर) चित्रपटाने पुन्हा उभारी घेतली आणि जवळपास ९० लाखांची कमाई केली. त्यामुळे २७ सप्टेंबरपर्यंत एकूण गल्ला १९.८० कोटींवर पोहोचला आहे. रविवारीची (२८ सप्टेंबर) आकडेवारी आल्यानंतर २० कोटींचा टप्पा सहज पार होईल, असा अंदाज वर्तवला जातोय.



या चित्रपटासाठी दुसऱ्या आठवड्यातील रविवार विशेष ठरला. २१ सप्टेंबर रोजी चित्रपटाने तब्बल ३ कोटींची कमाई करून स्वत:चा विक्रम प्रस्थापित केला होता. सुबोध खानोलकर दिग्दर्शित या चित्रपटात दिलीप प्रभावळकर, प्रियदर्शिनी इंदलकर, सिद्धार्थ मेनन, महेश मांजरेकर, भरत जाधव, विजय केंकरे, रवी काळे, अभिनय बेर्डे, सुनील तावडे आणि आरती वडगबाळकर यांसारखे नामांकित कलाकार झळकले आहेत. तसेच कोकणातील स्थानिक कलाकारांचाही या सिनेमात सहभाग आहे.

मदशावतारफ ची भव्यता, कथानक आणि कलाकारांची ताकदवान भूमिका यामुळे प्रेक्षकांना हा सिनेमा आकर्षित करतोय. त्यामुळे तिसऱ्या आठवड्यानंतरही या चित्रपटाची कमाई सुरू राहण्याची शक्यता आहे.

## स्टुडंट ऑफ द इयर अभिनेत्याच्या बॅगेत ३५ कोटींचे कोकेन
### एअरपोर्टवरच ठोकल्या बेड्या

मुंबई – बॉलीवूड आणि ड्रग्स हे कनेक्शन अनेक वेळा समोर आले आहे. नुकतच 'स्टुडन्ट ऑफ द इयर' या चित्रपटात काम केलेल्या एका सहकलाकाराला चेन्नई एअरपोर्टवर ड्रग तस्करी प्रकरणी अटक करण्यात आली. या अभिनेत्याकडून पोलिसांनी ३.५ किलो कोकेन जप्त केले आहे. या ड्रग्स ची किंमत अंदाजे ३५ कोटी असल्याची प्राथमिक माहिती आहे. नुकताच सिंगापूर मधून परत येत होता तेव्हा त्याला कस्टम आणि महसूल गुप्तचर संचालनालयाच्या संयुक्त पथकाने रोखले. त्याच्या ट्रॉली बॅगच्या एका सीक्रेट डब्यात कोकेन लपवल्याचे आढळले.

या अभिनेत्याचे नाव अजून उघड झा–लेले नाही. बॉलीवूडमधील चित्रपटांमध्ये लहानसहान भूमिका करणाऱ्या या सहकलाकाराला विमानतळावर थांबवण्यात आलं .त्याची तपासणी करण्यात आली त्यावेळी ३.५ किलोच्या अंमली पदार्थासह त्याला पकडण्यात आले.

विशेष गुप्त माहितीच्या आधारे कस्टम्सच्या एअर इंटेलिजन्स युनिटने या अभिनेत्याला रविवारी पहाटे सिंगापूरहून चेन्नईत दाखल होताच थांबवले. तपासणीदरम्यान त्याच्या ट्रॉली बॅगच्या खालच्या गुप्त कप्प्यात प्लास्टिक पिशव्यांत पांढऱ्या रंगाचे पावडरसदृश्य पदार्थ आढळले. प्राथमिक चाचणीत ते कोकेन असल्याचे स्पष्ट झाले. अधिकाऱ्यांनी अभिनेत्याला ताब्यात घेऊन चौकशी सुरु केली असता तो कंबोडियाहून सिंगापूरमार्गे चेन्नईला आला असल्याचे उघड झाले. त्याने सांगितले की, कंबोडियामध्ये काही अनोळ–खी लोकांनी त्याला ही ट्रॉली दिली होती व ती चेन्नई विमानतळावर एका व्यक्तीकडे सुपूर्द करायची होती. मात्र, तपास यंत्रणांना शंका आहे की, हे कोकेन मुंबई किंवा दिल्लीतील आंतरराष्ट्रीय ड्रग्ज कार्टेलकडे पोहोचवण्याचा त्याचा हेतू होता. ींघ या संपूर्ण जाळ्याचा शोध घेत असून कस्टम्स विभाग त्याच्या प्रवासाच्या नोंदींची चौकशी करत आहे, जेणेकरून याआधीही त्याने अशा प्रकारे अंमली पदार्थांची तस्करी केली आहे का याचा उलगडा होऊ शकेल.

दरम्यान, मागील दोन आठवड्यांत चेन्नई विमानतळावर कोकेनची ही दुसरी मोठी पकड आहे. १६ सप्टेंबर रोजी इथिओपियाहून आलेल्या केनियाच्या नागरिकाकडून २ किलो कोकेन जप्त करण्यात आले होते. तर १ सप्टेंबर रोजी चेन्नई कस्टम्सने ५.६ किलो कोकेन फेरेरो रोशेर चॉकलेटच्या डब्यांत लपवून आणणाऱ्या दोन प्रवाशांना अटक केली होती.


## ऐश्वर्या-करिनाच्या आधी ही अभिनेत्री होती लक्स क्वीन



मुंबई–जुने चित्रपट आवडणाऱ्यांना लीला चिटणीस हे नाव कायम लक्षात राहिले आहे. त्या काळात त्या एक नामवंत अभिनेत्री होत्या. विशेष म्हणजे लक्स साबणाच्या जाहिरातीत झळकणाऱ्या पहिल्या भारतीय अभिनेत्री होण्याचा मान त्यांना मिळाला होता. १९४१ मध्ये त्यांनी केलेल्या त्या जाहिरातीनं खळबळ उडवली होती. त्या काळी इंग्रजी चित्रपटातील अभिनेत्रींचाच बोलबाला असताना एका भारतीय चेहऱ्याला मिळालेलं हे यश ऐतिहासिक होतं.

ब्राह्मण कुटुंबात जन्मलेल्या लीला चिटणीस यांचं लहान वयातच लग्न झालं. लवकरच चार मुलांची आई झालेल्या लीला पतीपासून वेगळ्या राहू लागल्या. मुलांचं पालनपोषण आणि शिक्षण ही मोठी जबाबदारी त्यांच्या खांद्यावर होती. त्या काळात त्यांनी एका शाळेत अध्यापन केलं. त्याचबरोबर नाटकांतून काम सुरू केलं आणि नंतर त्यांना चित्रपटसृष्टीत कामाची संधी मिळाली.

सिनेमात प्रवेश –१९३६ मध्ये आलेल्या 'छाया' या चित्रपटातून त्यांना खरी ओळख मिळाली. त्याआधी 'जेंटलमन डाकू' या चित्रपटातून त्या पहिल्यांदा झळकल्या. त्या काळी एखाद्या स्त्रीनं चित्रपटसृष्टीत काम करणं समाज्याला मान्य नव्हतं. मात्र, शिक्षण आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर त्यांनी कोणाचाही विचार न करता आपली वाट चालू ठेवली.त्यांच्या लोकप्रियतेमुळे लक्स साबणाच्या जाहिरातीसाठी त्यांची निवड झाली. मोठ्या डोळ्यांची, बोलक्या चेहऱ्याची लीला चिटणीस या जाहिरातीमुळे घराघरात पोहोचल्या. त्यामुळे त्या 'लक्स'साठी झळकणाऱ्या पहिल्या भारतीय अभिनेत्री ठरल्या.आईपण आणि करिअरचा समतोललीला चिटणीस यांनी आपल्या आयुष्याचं वर्णन 'चंदेरी दुनियेत' मराठी आत्मकथेत केलं आहे. त्यात त्यांनी सांगितलंय की, स्टुडिओत शूटिंग करत असतानाही घरच्या मुलांची काळजी त्यांच्या मनातून जात नसे. चौथ्या मुलाच्या जन्मानंतर तर हा ताण अधिक वाढला. आया फोनवरून मुलं भांडत असल्याची तक्रार करत असे आणि लीला शूटिंगमधून त्यांना शांत करण्याचा प्रयत्न करत असे. शेवटी त्यांनी मुलांना बोर्डिंग स्कूलमध्ये घालण्याचा निर्णय घेतला.१९३९ मध्ये आलेला 'कंगन' हा हिंदी चित्रपटसृष्टीचा पहिला ब्लॉकबस्टर मानला जातो.



# डॉ. हरिवंशराय बच्चन विद्यालयाच्या चिमुकल्यांकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीस १ लाख ११ हजार १११ सुपूर्द

लातूर/प्रतिनिधी : डॉ. हरिवंशराय बच्चन विद्यालय, अहमदपूर जि . लातूरच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी अतिवृष्टीग्रस्तांसाठी ओले रंग या चित्र प्रदर्शनातून १ लाख ११ हजार १११ रुपयांची रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी सुपूर्द केली.

डॉ. हरिवंशराय बच्चन विद्यालयाच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी लातूर जिल्हा परिषदेच्या स्थायी समिती सभागृहात पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ओले रंग चित्र प्रदर्शनाचे आयोजन केले होते. या चित्र प्रदर्शनास अतिशय उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. या चित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून आलेल्या १ लाख ११ हजार १११ रुपयांच्या रकमेचा धनादेश संस्थेचे संस्थापक अध्यक्ष निवृत्ती यादव यांनी विद्यार्थ्यांसमवेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत






वर्षा या शासकीय निवासस्थानी भेट घेऊन त्यांच्याकडे सुपूर्द केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस संवेदनशील चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या या कृतीने अक्षरशः भारावून गेले. आपदग्रस्तांच्या मदतीसाठी पुढाकार घेऊन या विद्यार्थ्यांनी केलेली कृती प्रत्येकासाठी प्रेरणादायी असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या. संस्थेचे संस्थापक निवृत्ती यादव यांनी यावेळी आपल्या संस्थेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध समाजोपयोगी उपक्रमांची माहिती मुख्यमंत्र्यांना दिली. संस्थेच्या वतीने आतापर्यंत वेळोवेळी नैसर्गिक आणि राष्ट्रीय आपत्तीच्या वेळी संस्थेच्या वतीने सर्वतोपरी आर्थिक सहायता करण्यासाठी पुढाकार घेतला जात असल्याचे सांगितले.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस झाले भावूक**

राज्यातील आपदग्रस्तांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीस सहाय्यता करण्याचे आवाहन केले जाते आणि त्याला नागरिकांकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळतो, ही बाब खरी असली तरी अहमदपूरच्या डॉ. हरिवंशराय बच्चन विद्यालयाच्या चिमुकल्या विद्यार्थांनी पुरग्रस्तांच्या मदतीसाठी चित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून निधी संकलित केल्याचे पाहून आपणास अतिशय समाधान वाटल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. शासनाने आवाहन केले आहे म्हणून नव्हे तर पुरग्रस्तांच्या व्यथा पाहून आपणही त्यांच्यासाठी काहीतरी केले पाहिजे, मदतीसाठी खारीचा उचलला पाहिजे या भावनेने विद्यार्थ्यांनी उचलेले हे मदतीचे पाऊल राज्यात प्रत्येक व्यक्तीला सामाजिक जाणिवा जागृत करुन चालण्याची शिकवण देणारे आहे. या विद्यालयातील पाचवीमध्ये शिकणारी विद्यार्थिनी कु. स्वरा दीपक नराळे हिने रेखाटलेल्या हरवलेलं सारं काही पुन्हा उभारुया एकजुटीने पुढे जाऊ या.. मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा, पाठीवरती हात ठेवून नुसते लढ म्हणा.. या चित्रावर मुख्यमंत्र्यांनी स्वतः स्वाक्षरी करून आपल्या महाराष्ट्र राज्याला एवढ्या उदात्त दृष्टीकोनाने चालणारे भावी नागरिक मिळणार असल्याचे पाहून आपले मन भरून आल्याचे बोलून दाखविले . या विद्यार्थ्यांनी संपूर्ण राज्यापुढे मदत - सहकार्याचा एक नवा आदर्श निर्माण करण्याचे काम केल्याची प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केली.

## हँडबॉल स्पर्धेत दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलांचा व मुलींचा संघ जिल्हा स्तरावर प्रथम



**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,लातूर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या म.न.पा. अंतर्गत हँडबॉल स्पर्धेत दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय,लातूरच्या मुलांचा व मुलींच्या संघाने जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक मिळविला.या स्पर्धा दि.३० सप्टेंबर २०२५ रोजी लातूर येथील श्री.गोदावरीदेवी लाहोटी कन्या विद्यालयात झाल्या.मुलींच्या संघात रुतजा जोशी,वैभवी बुरगे,वैष्णवी सुरवसे,पल्लवी गुरील,रुतुजा कांबळे,शेख महेक,अनुजा खोसे,स्नेहा राऊत,मगर श्रुती यांचा समावेश होता तर मुलांच्या संघात प्रणिश अयाचित, विशाल बिराजदार,सोहम चवळके,गणेश,शुभम काळे,शिवदर्शन,रोहन पांचाळ,अखीब,प्रेम जोशी,आत्मज घडेकर,राज उपाध्याय,अखिब सय्यद यांचा समावेश होता.या यशस्वी खेळाडूना डॉ.महेश बेंबडे,प्रा.निशिकांत सदाफुले,प्रा. विनोद गेवारे,प्रा.वैष्णवी जोशी यांचे मार्गदर्शन लाभले.

सदरील विजयी खेळाडूंचे अभिनंदन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे,पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरूडकर यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## लातूरच्या गंजगोलाईतील जय जगदंबा मातेचे आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते जगदंबा मातेची आरती, मातेचे मनोभावे घेतले दर्शन



**लातूर/प्रतिनिधी :** नवरात्रोत्सवाची सर्वत्र धामधूम सुरू असून असत्यावर सत्याचा विजय म्हणजे आजचा विजयादशमी दसराचा दिवस राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज दि. २ ऑक्टोबर रोजी सकाळी दसऱ्याच्या निमित्ताने लातूरच्या मुख्य बाजारपेठेतील असलेल्या गंजगोलाई भागातील श्री. जय जगदंबा मातेचे मनोभावे दर्शन घेतले तसेच त्यांनी यावेळी देवी मातेचे मनोभावे पूजन करीत देवीची आरती केली. यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे, माजी आमदार विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन वैजनाथ शिंदे, श्री.जय जगदंबा नवरात्र महोत्सव मंडळ गंजगोलाईचे अध्यक्ष शिवशंकर बिडवे, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, माजी उपमहापौर कैलास कांबळे, बसवंतआप्पा भरडे, गंगाधरआप्पा हामने, दगडूआप्पा मिटकरी, संजय हत्ते, लक्ष्मीकांत मंठाळे, मन्मथआप्पा पंचाक्षरी, संजय हत्ते, लातूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुभाष घोडके, विष्णुदास धायगुडे, अभिजित अंकलकोटे, वीरभद्र वाले, राम स्वामी, विजय टाकेकर, अब्दुल्ला शेख, करीम तांबोळी, अभिमान भोळे आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक, देवी भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पूरग्रस्तांसाठी शिवाई प्रतिष्ठानची बांधिलकी किराणा किटसह ब्लँकेटसचे वाटप

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात अतिवृष्टी व महापुराने मोठे नुकसान झाले असून अनेक नागरीकांच्या घरां- संसारास त्याचा मोठा फटका बसला आहे. आपत्तीने भरडलेल्या अशा परिवारांसाठी लातूर येथील शिवाई प्रतिष्ठान सरसावले असून प्रतिष्ठानच्या वतीने गरजूंना देण्यासाठी शंभर किराणा किट व शंभर ब्लँकेटस बुधवारी (दि.१) सुपूर्द करण्यात आल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानच्या अध्यक्षा उषा भोसले होत्या. डॉ. जयश्री धुमाळ, संगिता देशमुख, सई गोरे, डॉ. माधुरी कदम, डॉ. हर्षवर्धन राऊत, डॉ. अभय कदम, हंसराज जाधव, विशाल जाधव, डी.एस. पाटील, धनंजय शेळके आदिंची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उषा भोसले यांनी शिवाई प्रतिष्ठान सदैवच सेवाकार्यात पुढे असते शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण आदीत कार्य सुरू असल्याचे सांगितले.

## राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आ. अमित देशमुख यांनी पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन केले अभिवादन



**लातूर/प्रतिनिधी :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री,लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी गुरुवार दि. २ ऑक्टोबर रोजी लातूर शहरातील महात्मा गांधी चौक येथे जाऊन राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हा.चेअरमन विजय देशमुख, माजी उपमहापौर कैलास कांबळे, लातूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुभाष घोडके, सी.ए.प्रकाश कासट, इम्रान सय्यद, व्यंकटेश पुरी, अमित जाधव, सुरेश चव्हाण, राम स्वामी, गोटू यादव, आसिफ बागवान, देविदास बोरुळे पाटील, यशपाल कांबळे, सुलेखा कारेपूरकर, राज क्षिरसागर, अंगद गायकवाड, फारूक शेख, बिभीषण सांगवीकर, मोहन सुरवसे, राजू गवळी, प्रवीण सूर्यवंशी, रमेश सूर्यवंशी, गोपाळ बुरबुरे, विष्णुदास धायगुडे, अंगद गायकवाड, राम स्वामी, विजय टाकेकर, अब्दुल्ला शेख, करीम तांबोळी, अभिमान भोळे आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते नागरिक उपस्थित होते.



## कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव महात्मा गांधीजी आणि लालबहादूर शास्त्री यांना जयंतीनिमित्त अभिवादन

बाभळगाव : दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ बाबळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने अहिंसा, सत्य आणि सहिष्णुता याची शिकवण देणारे राष्ट्रपिता महात्मा गांधीजी आणि भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्ताने अभिवादन करण्यात आले.

प्रारंभी डॉ. कांतराव पोले आणि प्रा.विवेक कदम यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून या अभिवादन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. सुरेशकुमार कांबळे, डॉ. शाहूराज मुळे, डॉ. मा.ना. गायकवाड, प्रा. सोपान डोपे, प्रा. संदिपान चेवले, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दत्ता फ ु लगामे, राहुल गुरमे आणि तुकाराम मनदुमले यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी स्वयंसेवक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त विश्वरत्न परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास आ. अमित देशमुख यांनी पुष्पहार अर्पण करून केले विनम्र अभिवादन

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी गुरुवार दि. २ ऑक्टोबर रोजी लातूर शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे जाऊन धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त विश्वरत्न परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. सर्वांना धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.




यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, माजी उपनगराध्यक्ष मोहन माने, रेणा सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन प्रवीण पाटील, माजी उपमहापौर कैलास कांबळे, लातूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुभाष घोडके, प्रा. प्रवीण कांबळे, इम्रान सय्यद, व्यंकटेश पुरी, बाबासाहेब गायकवाड, चंद्रकांत चिकटे, अतिश चिकटे, दगडूआप्पा मिटकरी, संजय ओहळ, सुमित खंडागळे, राजू गवळी, अकबर माडजे, गोरोबा लोखंडे, करुणा शिंदे, सुलेखा कारेपूरकर, शरद देशमुख, पंडित कावळे, सुरेश चव्हाण, राम स्वामी, गोटू यादव, आसिफ बागवान, देविदास बोरुळे पाटील, यशपाल कांबळे, राज क्षिरसागर, अंगद गायकवाड, फारूक शेख, बिभीषण सांगवीकर, मोहन सुरवसे, राजू गवळी, प्रवीण सूर्यवंशी, रमेश सूर्यवंशी, गोपाळ बुरबुरे, विष्णुदास धायगुडे, अंगद गायकवाड, राम स्वामी, विजय टाकेकर, अब्दुल्ला शेख, करीम तांबोळी, अभिमान भोळे आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते नागरिक उपस्थित होते.

## दयानंद विज्ञानमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.०२ ऑक्टोंबर २०२५ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी जगाला सत्य,अहिंसा व सहिष्णुता यांची शिकवण देणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी व जय जवान जय किसान हा घोषणामंत्र देणारे भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि सर्वांना जयंतीच्याही




शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरूडकर,डॉ.रामशेट्टी शेटकार,सुमित हसाळे,सचिन सूर्यवंशी यांच्यासह इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# धाराशिवमध्ये रोजगाराचा आनंदसोहळा

धाराशिव दि.१,(जिमाका):-जिल्ह्यातील अनेक कुटुंबांना दिलासा देणारा आणि तरुणांच्या आशा-स्वप्नांना बळ देणारा आनंदाचा क्षण आता जवळ आला आहे.शासनाच्या सर्वसमावेशक सुधारीत धोरणान्वये अनुकंपा नियुक्तीसह महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून (चझडउ) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेशांचे वितरण करण्यात येणार आहे.

दि.१७ जुलै २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमाअंतर्गत,राज्यातील विविध शासकीय कार्यालये व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये गट -क व गट-ड या पदांवर अनुकंपा नियुक्ती करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आली. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय,जिल्हा परिषद,पोलीस विभाग व अन्य विभागांतून पात्र उमेदवारांची निवड करण्यात आली आहे.याशिवाय महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत लिपिक- टंकलेखक (गट-क) पदांवरही उमेदवारांची निवड करण्यात आली आहे.

या सर्व उमेदवारांना ४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे आयोजित मेळाव्यात नियुक्ती आदेश प्रदान करण्यात येणार आहेत.या कार्यक्रमात परिवहनमंत्री तथा पालकमंत्री श्री.प्रताप सरनाईक यांच्या हस्ते नियुक्ती आदेशांचे वितरण होणार आहे.

जिल्हा प्रशासनाच्या वतीने नियुक्ती आदेश निर्गमित करणारे अधिकारी तसेच सर्व निवड झालेल्या उमेदवारांना या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह व शिष्यवृत्ती योजनांच्या प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर

धाराशिव (जिमाका):-इतर मागास प्रवर्ग,विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासनाने वसतिगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम या योजनेंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर केले आहे. जिल्ह्यात १०० विद्यार्थी क्षमतेचे मुला-मुलींसाठी वसतिगृह सन २०२४-२५ पासून सुरू असून,यंदाही विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळणार आहे.अर्ज ऑनलाईन पद्धतीने https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर करावेत,असे आवाहन सहाय्यक संचालक श्री. अमोल ताकभाते यांनी केले आहे. वसतिगृह असलेल्या जिल्ह्यांसाठी वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे. अर्ज करण्याचा कालावधी : ३० सप्टेंबर ते २६ ऑक्टोबर २०२५ आहे.अर्ज छाननी : २७ ते ३० ऑक्टोबर २०२५.पहिली निवड यादी प्रसिद्ध : ३१ ऑक्टोबर २०२५. प्रवेशाची अंतिम मुदत : १० नोव्हेंबर २०२५.दुसरी यादी प्रसिद्ध : १३ नोव्हेंबर २०२५.दुसऱ्या यादीतील प्रवेशाची अंतिम मुदत : २० नोव्हेंबर २०२५ आहे.

वसतिगृह नसलेल्या जिल्ह्यांसाठी वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे.

अर्ज करण्याचा कालावधी : ३० सप्टेंबर ते २६ ऑक्टोबर २०२५.अर्ज छाननी : २७ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर २०२५.पहिली निवड यादी प्रसिद्ध : २० नोव्हेंबर २०२५. प्रवेशाची अंतिम मुदत : २८ नोव्हेंबर २०२५. दुसरी यादी प्रसिद्ध : १ डिसेंबर २०२५.दुसऱ्या यादीतील प्रवेशाची अंतिम मुदत : ८ डिसेंबर २०२५ आहे.

वसतिगृहाच्या क्षमतेअभावी प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज पंडीत दिनदयाल स्वयंम व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार या योजनांसाठी विचारात घेतले जातील.

# मुरूम शहरातील अंबाबाई मंदिरात सीमोल्लंघन भक्तिमय वातावरणात संपन्न



मुरूम (डॉ. रामलिंग पुराणे ) विजयादशमीनिमित्त श्री अंबाबाई मंदिरात दि.०२ रोजी प्रतिवर्षीप्रमाणे सीमोल्लंघनचा कार्यक्रम आनंदाने आणि भक्तिमय वातावरणात पार पडले, दरवर्षी प्रमाणे याही वर्षी माळी पाटीलचा मान ऍड राजसाहेब पाटील, प्रशांत पाटील त्याचबरोबर जेष्ठ नागरिक पोलीस पाटील,प्रमोद आबा कुलकर्णी यांनाही पूजेचा मान असतो, मुरूम महसूल मंडळ तलाठी कार्यालय कर्मचारी आदीचा प्रमुख उपस्थिती होती. गेले अनेक वर्षांपासून सुरू असलेली परंपरा मुरूम नगरीत अगदी भक्तिमय वातावरणात साजरा होत असते, आपट्याची झाडाच्या फांदीचे ढिगाचे विधिवत पूजा करून मानकरी राजसाहेब पाटील,प्रशांत पाटील,प्रमोद आबा कुलकर्णी यांच्या हस्ते सीमोल्लंघन कार्यक्रम संपन्न झाले. दसऱ्याच्या दिवशी आपट्याच्या झाडाची पाने एकमेकांना सोने म्हणून वाटली जातात. गावातील अंबाबाई मंदिरासमोर आपट्याच्या झाडाची मोठया फांदीचा ढिगारा उभी केली जाते. त्याची विधिवत पूजा केली जाते आणि मग ती पाने उपस्थित लोक तोडून घेतात.हे सोने लुटण्याचा एक प्रकार असते. त्यानंतर ही पाने एकमेकांना सोने म्हणून दिली जातात. देवाला वाहिली जातात. तदनंतर मुरूम शहरात ग्राम प्रदक्षिणा करीत शहरातील लक्ष्मी मंदिर, हनुमान मंदिरात आपटेचे पाने वाहून व त्याच बरोबर आरती केली जाते, महाराष्ट्राच्या पारंपरिक पद्धतीने आपट्याची पाने लुटून आणल्यानंतर घराच्या दारात त्यांची आरती केले जाते व त्यानंतर देवाऱ्यावरी बांधलेल्या कडकण्या तोडून तोंड गोड केले जाते, प्रारंभी सकाळी मंदिरा समोर होम हवन पूजन संपन्न झाले सायंकाळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते तलाठी कार्यालया समोर भारतीय तिरंगा ध्वजाचा पूजन करून वाजत गाजत अंबाबाई मंदिरापर्यत मिरवूनक काढण्यात आली. विजयादशमी निमित्त अंबाबाई मंदिरात नागरिकांची दर्शनासाठी तुफान गर्दी झाली होती. मंदिर समितीच्या वतीने मंदिर व परिसरात भक्तांना दर्शनासाठी समस्या निर्माण होऊ नये यासाठी काळजी घेण्यात आले होते. पोलीस प्रशासनाच्या वतीने बंदोबस्त लावण्यात आला होता. शहरातील सुभाष चौकातील अंबाबाई मंदिरातील श्री अंबाबाईचे पालखी मिरवणूक काढण्यात आली होती. एकंदरीत मुरूम शहरात दसरा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

**Name of change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **SYED FAISAL ALI. TO: SYED FAISAL ALI SYED SADIQ ALI.**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **SYED FAISAL ALI SYED SADIQ ALI** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **SYED FAISAL ALI.**
NEW NAME:- **SYED FAISAL ALI SYED SADIQ ALI .**
Address :- SULTAN PURA, OPPOSITE SHIRIN KIRANA STORE , SHIRIN COLONY, OSMANABAD. -413501.
Adhar no.-270173355883. Mob. No.-8483980229

# धाराशिवातील गृहविभाग कर्मचारी संघटनेचा अभिमानास्पद ठसा



धाराशिव (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य गृहविभाग कार्यालयीन कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या नाशिक येथे झालेल्या दोन दिवसीय 'योद्धा प्रशिक्षण शिबिरा'त धाराशिव घटकातील सभासदांनी उत्साहपूर्ण सहभाग नोंदवत ठसा उमटवला.

धाराशिव पोलीस अधीक्षक कार्यालयातून अध्यक्ष सागर करे, सोनार, चंद्रशेखर कुलकर्णी यांच्यासह सह सरचिटणीस अनिल अशोक पाटील यांनी उपस्थित राहून संघटनात्मक कामे व कार्यालयीन कामकाजाचा ताळमेळ या विषयावर मार्गदर्शन केले.

राज्यातील ८० हून अधिक पोलीस कार्यालयांतील पदाधिकारी या शिबिरात सहभागी झाले. संघटन कौशल्य, कार्यालयीन शिस्त, सोशल मीडिया वापर, आर्थिक नियोजन अशा विविध विषयांवर सत्रे पार पडली.

धाराशिवची कन्या पुनम डोंगरे यांनी पर्यवेक्षीय परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवत जिल्ह्याचा मान वाढवला. त्या प्रत्यक्ष शिबिरात अनुपस्थित असल्या तरी त्यांचा सत्कार धाराशिवच्या सभासदांनी स्वीकारला.

शिबिराला महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष विश्वास काटकर, गृहविभाग कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष गणेश देशमुख, तसेच सरचिटणीस शरदचंद्र व्यापारी यांची उपस्थिती लाभली.

धाराशिवच्या सभासदांच्या सहभागामुळे जिल्हा संघटनेला नवी ऊर्जा मिळाली असून हक्कांसाठी अधिक नियोजनबद्ध आणि जोमाने लढा देऊ,असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# श्री विठ्ठलसाई साखर कारखान्याचा बॉयलर प्रदिपन सोहळा संपन्न



मुरूम (सुधीर पंचगल्ले)मुरूम येथील श्री विठ्ठलसाई सहकारी साखर कारखान्यागा हंगाम २०२५-२६ साठीया बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा कारखाना कार्यस्थळावर आज रोजी माजी मंत्री, अध्यक्ष भारतीय जनता पक्ष, लातूर जिल्हा (ग्रामीण) व आपल्या कारखान्याचे चेअरमन मा.श्री. बसवराज पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

श्री विठ्ठलसाई कारखान्याचे कामकाज मा.श्री बसवराज पाटील याच्या नियोजनबध्द मार्गदर्शनाखाली सुरू असून चालू हंगामासाठी करावयाची संपूर्ण कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.

यावर्षी कारखाना कार्यक्षेत्रात लागण व खोडवा मिळून जवळपास १४००० हेक्टर उत्साची नोंद झालेली आहे. यासाठी कारखाना व्यवस्थापनाने ५ लाख मे. टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट निश्चीत केले आहे. यासाठी पुरेशी ऊसतोड व वाहतुक यत्रणा भरती करून त्याचे नियोजन करण्यात आले आहे कारखान्याचा मोळी पुजनाचा कार्यक्रम पुढील आठवडयात होणार आहे. या हंगामात कार्यक्षेत्रातील गाळपास आलेल्या ऊसास योग्य भाव देण्यात येणार असून कोणाचाही ऊस गाळपाविना शिल्लक राहणार नाही अशी ग्वाही कारखान्याचे चेअरमन मा.श्री. बसवराज पाटील यांनी यावेळेस दिली. याप्रसंगी मा.श्री. बापुराव पाटील, चेअरमन धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., धाराशिव, कारखान्याचे व्हा. चेअरमन मा.श्री. सादीकसाहेब काझी, उमरगा जनता सहकारी बँकेचे चेअरमन मा.श्री. शरण पाटील तसेच कारखान्याचे संचालक सर्वश्री शरणप्पा पत्रिके, ॲड. सुभाषराव राजोळे, अनिल सगर, रहेमान जमादार, गोविंदराव पाटील, भालचंद्र लोखंडे, शरणप्पा कबाडे, सचिन पाटील,

केशवराव पवार, माणिकराव राठोड, विठ्ठलराव बदोले, संगमेश्वर घाळे, दिलीप पाटील, दत्तू भालेराव, शिवलींग माळी, ॲड. संजय बिराजदार, ॲड. विरसंगप्पा आळगे तसेच मल्लिनाथ दंडगे, प्राचार्य राम सोलंकर, प्राचार्य अशोक सपाटे, रशिद शेख, प्रा. शौकत पटेल, नाना सुर्यवंशी,

**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**

# पूरग्रस्तांचे अश्रू पुसण्यासाठी पक्ष, संस्था, व्यावसायिकाची मदत:पूरग्रस्तांसाठी मुसळेंकडून १५,५०१ रुपये



परंडा (प्रतिनिधी)-पूरग्रस्तासाठी तुळजापूरचे व्यवसायिक मुसळे यांचा वतीने १५,५०१ रुपयांचा धनादेश तहसीलदार यांच्याकडे सुपूर्द केला आहे. मराठवाड्यात मुसळधार पावसाने धुमाकूळ घातला असून, पूर परिस्थितीने शेती वाहून गेली आहे. संसार उघड्यावर आले आहेत. अशा संकट प्रसंगी तुळजापूरचे व्यावसायिक मुसळे पूरग्रस्तांचा मदतीला धावून आले आहेत. त्यांचा श्री डिजिटल तुळजापूरच्या धनादेश जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आला आहे. तुळजापूर । तालुक्यातील पूरग्रस्तांना शिवसेना शिंदे गटाचा वतीने तालुका प्रमुख अमोल जाधव यांनी किराणा किटचे वाटप केले आहेत. तालुक्यातील कुन्सावळी, बोळेगाव, मानेवाडी वडगाव देव आदी गावात किराणा साहित्याचे किट वाटप केले आहेत. तालुक्यातील अनेक गावात पूरस्थिती निर्माण झाली होती. पुराचे पाणी घरात शिरून संसार उघड्यावर आले अशांच्या मदतीला शिवसेना धावून आली असून, सातत्याने मदतकार्य सुरू आहे. तालुक्यातील विविध गावांत पूरग्रस्तांना किराणा किटचे वाटप करण्यात येत आहे. तालुक्यातील कुन्सावळी, बोळेगाव, मानेवाडी या गावांनंतर आता वडगाव देव येथे शिवसेनेच्या वतीने पूरग्रस्त कुटुंबांना किराणा किटचे वाटप केले आहे. या मदतकार्यात तुळजापूर तालुकाप्रमुख अमोल जाधव आघाडीवर असून त्याचा सोबत संभाजी नेपते, शहाजी हाके, स्वप्निल सुरवसे, राहूल शिंदे, विकास जाधव, मीना सोमाजी, राधाताई घोगरे, कपिल देवकते, रवी देवकते आदी शिवसैनिकांची उपस्थिती होती.

## कपिलापुरी येथील पूरग्रस्तांना मदत

परंडा तालुक्यातील कपिलापुरी येथील पूरग्रस्त शेतकऱ्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून किटचे वाटप करण्यात आले. परंडा तालुक्यातील कपिलापुरी गावासह वाड्या -वस्त्यांवरील गरजू शेतकऱ्यांना आवश्यक किराणा धान्य किट वाटप केले. महापुराने थैमान घातलेले ८-१० दिवस जनजीवन विस्कळीत झालेले होते. परंडा कुर्डुवाडीचा पूर्णपणे संपर्क तुटलेला होता. अशातच माजी आमदार राहुल मोटे यांनी शेतकऱ्यांना किराणा किट पुरवठा करत सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अ. प.)परंडाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649